POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२९२ ● मुंबई, सोमवार, २५ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

जून महिन्यात रिटायर होणार होती... त्या आधीच बिंग फुटलं

नीट पेपरफुटी प्रकरणातील तिसरी मनीषा कोण? सदाशिव पेठेत खळबळ

नीट पेपरफुटी प्रकरणात अजब गजब योगायोग

एक नव्हे 2 तर चक्क 3 मनीषा

नीट पेपरफुटीप्रकरणी मनिषा या नावावरून मोठा विचित्र योगायोग समोर आला आहे. कारण या प्रकरणातील पुण्यातली तिसरी आरोपी देखील मनिषाच निघाली. म्हणजेच नीटचा पेपर फोडण्यात या तीन मनीषा नावाच्या महिलांचा हात असल्याचं आता समोर आलंय, यातील दोन मनीषा या प्राध्यापक आहेत.

नीट पेपरफुटी प्रकरणात एक अजब-गजब योगायोग समोर आला आहे. पेपरफुटीप्रकरणात एक नव्हे दोन तर चक्क तीन मनीषा नावाच्या महिलांचा हात असल्याचं समोर आलं आहे, या प्रकरणात आणखी एक महिलेचं नाव समोर आलं आणि या महिलेचं नाव देखील मनिषाच निघालं आहे. पुण्यातली पहिली अटक ही मनिषा वाघमारेला बिबवेवाडीतून झाली ती या पेपरफुटी प्रकरणातील एजंट होती, तर दुसरी आरोपी मनिषा मांढरे ही जीव शास्त्राची प्राध्यापिका निघाली या दोन्ही मनिषा बिबवेवाडीतील एकाच सोसायटीत राहत असून त्या मैत्रिणी देखील निघाल्यात. तर तिसरी मनिषा ही प्राध्यापिकाच निघाली असून ती देखील एनटीएची पेपर सेटर आहे. मनीषा मांढरे मॉडर्न महाविद्यालयात प्राध्यापिका आहे, फिजिक्स आणि बॉटनी विषय शिकवतात.. पेपरफुटी प्रकरणात ती मुख्य संशयित आहे. ठळअ परीक्षेत पेपर समन्वयकही होत्या. मनीषा वाघमारे ही पुण्यात ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते. पार्लरच्या माध्यमातून पेपर लीक करून श्रीमंत पालकांना पेपर विकल्याचा आरोप तिच्यावर आहे. मनीषा हवालदार ही फिजिक्सची प्राध्यापिका आणि ठळअची पेपर सेंटर. फिजिक्सचे प्रश्न फोडल्याचा तिच्यावर आरोप, अटकेनंतर विद्या प्रसारिणी सभेकडून मनीषा हवालदारचं निलंबन करण्यात आले. तिन्ही मनीषा आणि पी.व्ही कुलकर्णी अशा चौघांनी मिळून नीटचा पेपर फोडल्याचं सीबीआयच्या तपासातून समोर आलं आहे. नीट पेपर फुटी प्रकरणी सीबीआयने प्रा. मनिषा हवालदार यांना अटक करताच संबंधित शिक्षण संस्थेनं त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केलीय...विद्या प्रसारिनी सभा या शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. सतिष दळवी यांनीच ही माहिती दिली आहे. सीबीआयनं या संस्थेची झाडाझडती घेतल्याचंही दळवी यांनी सांगितलं आहे. शाळेतून मनीषा हवालदारचं कँम्पुटर हार्ड डिक्स, आणि कार्यालयातील सीसीटीव्ही देखील जप्त केली आहे. मनीषा हवालदारच्या अटकेनंतर सीबीआयनं पुण्यात इतरही ठिकाणी छापे टाकले आहेत, सदाशिव पेठ, कात्रज, शिवाजीनगरमध्ये छापे टाकण्यात आले आहेत, या भागांमध्ये मनिषा हवालदारनं पेपर विकल्याचा संशय सीबीआयला आहे, त्यामुळे सीबीआयच्या तपासामधून या प्रकरणात आणखी काही धक्कादायक माहिती समोर येण्याची दाट शक्यता आहे.


सीबीआयने शुक्रवारी पुण्याच्या शेठ हिरालाल सराफ प्रशालेच्या मुख्याध्यापिका मनीषा संजय हवालदार यांना अटक केली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण गैरप्रकारात अटक झालेल्या 'मनीषा' नावाच्या त्या तिसऱ्या आरोपी ठरल्या आहेत.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

दिवसेंदिवस राज्याच नीट पेपरफुटी प्रकरण चांगलेच चर्चेत येत चालले आहे. या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाने अधिक तीव्र केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे आता पर्यंत सीबीआयने या प्रकरणी मनीषा वाघमारे, मनीषा मांढरेंवर कारवाई केली होती. आता आणखी एका मनीषाचा सहभाग असल्याचे समोर आले आहे. सीबीआयने शुक्रवारी पुण्याच्या शेठ हिरालाल सराफ प्रशालेच्या मुख्याध्यापिका मनीषा संजय हवालदार यांना अटक केली आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने मनीषा हवालदार यांची ह्यभौतिकशास्त्रह्ण विषयाच्या तज्ज्ञ म्हणून नियुक्ती केली होती. धक्कादायक बाब म्हणजे, त्या येत्या जून महिन्यातच शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणार होत्या. तसेच अटक करण्यात आलेल्या दुसऱ्या आरोपी मनीषा मांढरे आणि हवालदार या एकमेकींना चांगल्या ओळखत होत्या आणि त्यांच्यात वारंवार भेटीगाठीही होत असत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

७ तासांच्या छाप्यांनंतर घरातून अटक; दोन्ही मुले विदेशात

मनीषा हवालदार या पुण्याच्या सदाशिव पेठेतील 'लक्ष्मी निवास सोसायटी'मध्ये गेल्या २३ वर्षांपासून पती आणि वडिलांसोबत राहत आहेत. त्यांची दोन्ही मुले सध्या परदेशात उच्च शिक्षण घेत आहेत. शुक्रवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास सीबीआयचे पथक त्यांच्या फ्लॅटवर दाखल झाले होते. तब्बल ७ तास चाललेल्या कसून चौकशी आणि झाडाझडतीनंतर सीबीआयने घरातील काही



महत्त्वाचे दस्तऐवज आणि वस्तू जप्त केल्या व त्यानंतर हवालदार यांना ताब्यात घेऊन अटक केली.

मुख्याध्यापिका हवालदार निलंबित

मनीषा हवालदार या १९९२ पासून शाळेत कार्यरत होत्या. त्यांच्या अटकेनंतर हिरालाल सराफ विद्यालयाचे सचिव सतीश भालचंद्र गवळी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ''मनीषा हवालदार यांना नीट पेपरफुटी प्रकरणात अटक झाल्याचे आम्हाला प्रसारमाध्यमांद्वारेच समजले. त्या 'NTA' वर तज्ञ म्हणून काम करत होत्या, याची संस्थेला पुसटशीही कल्पना नव्हती आणि त्यांनी कधी तसे सांगितलेही नव्हते. त्या असे काही करतील असे आम्हाला कधीच वाटले नव्हते, या प्रकारामुळे शाळेचे नाव खूप बदनाम झाले आहे. संस्थेने तात्काळ कारवाई करत त्यांना सेवेतून निलंबित केले आहे'', असे म्हटले जात आहे.

दरम्यान, सीबीआयच्या टीमने गुरुवारी शाळेला भेट देऊन मुख्याध्यापिका हवालदार यांच्या केबिनमधील कॉम्प्युटरची हार्ड डिस्क, शाळेचे सीसीटीव्ही फुटेज आणि काही महत्त्वाची कागदपत्रे तपासासाठी जप्त केली आहेत.

शेतकऱ्यांना दिलासा मिळणार!

खरीप हंगामावर 'एल निनो'चे सावट... कृषी विभागाचा 'वॉर प्लान' तयार



'वॉर प्लॅन'मध्ये काय?

- गावागावांत जलसंधारण मोहीम
- नाला खोलीकरण आणि बंधारे
- शेततळी व प्लास्टिक अस्तरीकरण
- कमी कालावधीतील वाणांचा वापर
- आंतरपीक आणि सूक्ष्म सिंचनावर भर
- पुनर्पेरणीसाठी अतिरिक्त बियाणे साठा
- बनावट बियाण्यांवर डिजिटल नजर

■मुंबई । प्रतिनिधी,

आगामी खरीप हंगामावर ' एल निनो 'चे सावट असल्याने राज्य सरकारच्या कृषी विभागाने युद्धपातळीवर काम सुरू केले असून, विशेष 'वॉर प्लान' (कृती आराखडा) आखत, जलसंधारण, कमी कालावधीची पिके, दुबार पेरणीसाठी बियाणे साठा, शेततळी आणि सूक्ष्म सिंचनावर विशेष भर देण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे, 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेविषयी आतापासूनच शेतकऱ्यांमध्ये जनजागृती सुरू करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांसोबत महत्त्वाची बैठक

यंदा 'एल निनो'चा प्रभाव लक्षात घेता, राज्यातील पर्जन्यमान सरासरीच्या ९२ टक्के इतकेच राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वीच याविषयी कृषी विभागासह संबंधित विभागांची विशेष बैठक बोलाविली होती. या बैठकीनंतर आता कृषी विभागाने तयारीचाला वेग दिल्याचे समजते. कृषी विभागाकडून जिल्हास्तरावरील कामांवर, विशेषतः शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यावर भर दिल्याचे कळते. त्यानुसार, 'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहीम पुन्हा गतिमान करण्यात येत आहे. गावागावांत शिवार फेऱ्या, नाला खोलीकरण, बंधारे आणि पाणलोट विकासाची कामे तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

खरीप हंगामात सुमारे १५२.९७ लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणण्याचे नियोजन असून त्यासाठी बियाणे आणि खतांचा मोठा साठा तयार ठेवण्यात आला आहे. राज्याला गरजेच्या तुलनेत १३९ टक्के बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे. २०.१६ लाख क्विंटल बियाण्यांची गरज असताना, २८.०६ लाख क्विंटल साठा तयार ठेवण्यात आला आहे. सरकारने अतिरिक्त बियाण्यांचा साठा ठेवण्यामागे संभाव्य दुबार पेरणीची तयारी गृहीत धरलेली असू शकते.

'एल निनो'च्या प्रभावामुळे पावसात मोठा खंड पडल्यास अनेक भागांत दुबार पेरणीची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, राज्याने यंदा बनावट बियाणे आणि खतांविरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. 'साथी' पोर्टलद्वारे बियाण्यांचे उत्पादन, साठवण, वितरण आणि विक्री यावर डिजिटल पद्धतीने नियंत्रण ठेवले जात आहे.



छत्र्या काढून ठेवा... अलर्ट आला, मुंबईकरांनो पुढच्या अडीच ३ तासात दाणादाण...

राज्यात आज अनेक भागात हवामानात मोठा बदल झाला. विदर्भात काही जिल्ह्यांमध्ये थेट मोठा इशारा देण्यात आला. रेड अलर्ट जारी करण्यात आलाय. मुंबईत सकाळपासूनच ढगाळ वातावरण बघायला मिळत आहे. यादरम्यानच आता हवामान विभागाकडून मोठा इशारा देण्यात आला. मुंबईसह, रायगड आणि कोकणात पुढील तीन तासात पावसाला सुरुवात होईल. हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊल होईल. भारतीय हवामान विभागाने आज सकाळी नाऊकास्टमध्ये हा इशारा दिला. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, रायगड, रत्नागिरी आणि मुंबईमध्ये पाऊस होईल. यासोबतच पावसाचा येलो अलर्टही जारी करण्यात आला. आज सकाळपासूनच मुंबईसह उपनगरांमध्ये ढगाळ वातावरण बघायला मिळतंय. काही ठिकाणी पावसाच्या सरीही कोसळल्या. गेल्या काही दिवसांपासून राज्यात प्रचंड उकाडा होता. या पावसामुळे थोडा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

मोटेगावकरांचा तांब्यातून विद्यार्थ्यांवर पाणी शिंपडण्याचा व्हिडिओ व्हायरल

अंनिसचा संताप, कसून चौकशीची मागणी

■लातूर। प्रतिनिधी,

देशभरात खळबळ उडवून देर्णाया नीट पेपरफुटीप्रकरणात सीबीआयने लातूरमधील आरसीसी क्लासेसचे सर्वेसर्वा शिवराज मोटेगावकर यास अटक केली आहे. नीट पेपर फोडण्यात मोटेगावकरचा थेट सहभाग असून त्याने ४ दिवस अगोदरच प्रश्नपत्रिका मिळवल्याचं सीबीआयच्या तपासातून समोर आलं. त्यानंतर, मोटेगावकरचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाले आहेत. त्यामध्ये, परीक्षेनंतर विद्यार्थ्यांसोबतचा संवाद असेल किंवा आपल्या क्लासेसमध्ये जे शिकवलं तेच परीक्षेत आल्याचं सांगणारा व्हिडिओ असेल. आता, मोटेगावकरचा एक अंधश्रद्धा पसरवणारा व्हिडिओ व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. त्यावर, अंधश्रद्धा निर्मुलन समितीने प्रतिक्रिया देत, पोलीस तपासाची मागणी केलीय.

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे आधीच राज्यभर चर्चेत असलेल्या शिवराज मोटेगावकर यांचा आणखी एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रमाणात



व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये ते विद्यार्थ्यांवर तांब्याच्या भांड्यातील पाणी गवताच्या सहाय्याने शिंपडताना दिसत असल्याचा दावा केला जात आहे. या व्हिडिओनंतर विविध स्तरातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काहींनी तर हा अशोक खरातसारखाच घोर प्रकार असल्याची भावना सोशल मीडियातून व्यक्त केलीय. आता, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याध्यक्ष माधव बावगे यांनीही अशा प्रकारावर आक्षेप घेतला आहे.

पोलिसांनी कसून चौकशी करावी - बागवे

शैक्षणिक क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवला पाहिजे, त्याठिकाणी असे काम आणि अंधश्रद्धेचे प्रकार घडत असतील तर याचा जाहीर निषेध महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती करते, अशी प्रतिक्रिया माधव बावगे यांनी दिली. तसेच पोलिसांनी याची कसून चौकशी करावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. दुसरीकडे आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनीही ट्विट करुन प्रश्न विचारला आहे. अक्टर मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिवराज मोटेगावकर यांनी ''मंतरलेले पाणी शिंपडले. मग हे नेमकं अशोक खरात यांच्या ''उष्णो जल''च्या दाव्यांपेक्षा वेगळं कसं? जेव्हा अंधश्रद्धा हा व्यवसाय बनतो आणि मोठ्या लोकांशी ओळखी हे संरक्षणाचं कवच बनतं, तेव्हा त्याची किंमत सामान्य जनतेला मोजावी लागते. चमत्कारांचे दावे करणारी व्यक्ती तरुणांच्या विचारविश्वाला दिशा देण्याच्या भूमिकेत असू नये. दैवी उपचारांचे दावे असोत, श्रद्धेचे शोषण असो किंवा सत्तेचा गैरवापर असो,उपाय एकच आहे, निष्पक्ष चौकशी, आणि सर्वांसाठी समान न्याय,'' असे विजय कुंभार यांनी म्हटलं आहे. त्यामुळे, आता या व्हायरल व्हिडिओवरुन मोटेगावकरवर कारवाई होती का, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी अपडेट!

'या' तारखेपासून मिळणार मूळ गुणपत्रिका

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची घोषणा केली आहे. ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यानंतर आता विद्यार्थ्यांची मूळ गुणपत्रिका आणि इतर आवश्यक प्रमाणपत्रांची प्रतीक्षा संपणार आहे. राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये येत्या २५ मेपासून बारावीच्या विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिका वितरित करण्यात येणार आहेत.

शिक्षण मंडळाच्या माहितीनुसार, सोमवार २५ मे रोजी दुपारी ३ वाजल्यापासून विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधित कनिष्ठ महाविद्यालयातून गुणपत्रिका मिळण्यास सुरुवात होईल. यासोबतच स्थलांतर प्रमाणपत्र आणि शाळा सोडल्याचा दाखला देखील विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

फेब्रुवारी-मार्च महिन्यात झालेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल काही दिवसांपूर्वी ऑनलाईन जाहीर करण्यात आला होता. निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये मूळ मार्कशीट कधी मिळणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. विशेषतः अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, व्यवस्थापन आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी मूळ गुणपत्रिका आवश्यक असल्याने विद्यार्थ्यांची धावपळ सुरू होती.

दरम्यान, शिक्षण मंडळाने युद्धपातळीवर काम करत सर्व विभागीय मंडळांमार्फत गुणपत्रिका संबंधित शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांपर्यंत पोहोचवल्या आहेत. गुणपत्रिका वाटपावेळी कोणताही गोंधळ होऊ



नये यासाठी महाविद्यालयांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन स्वतंत्र काउंटर किंवा वर्गनिहाय वाटप व्यवस्था करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांनी गुणपत्रिका घेण्यासाठी जाताना स्वतःचे हॉल तिकीट किंवा ओळखपत्र सोबत बाळगणे अनिवार्य असल्याचे मंडळाने स्पष्ट केले आहे. तसेच गुणपत्रिका मिळाल्यानंतर त्यावरील नाव, आईचे नाव, विषय, गुण, टक्केवारी आणि इतर माहिती नीट तपासून पाहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जर गुणपत्रिकेमध्ये नावाची चूक, विषयातील त्रुटी किंवा गुणांबाबत कोणतीही तांत्रिक अडचण आढळल्यास विद्यार्थ्यांनी तात्काळ संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधावा. त्यानंतर शिक्षण मंडळाकडे दुरुस्तीसाठी आवश्यक प्रक्रिया करण्यात येणार आहे.

यंदा बारावीच्या निकालात उत्तीर्ण झालेल्या लाखो विद्यार्थ्यांसाठी ही घोषणा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. कारण पुढील काही दिवसांत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया वेग घेणार असून, मूळ कागदपत्रांशिवाय प्रवेश प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही.

शासनाचा महसूल बुडवणाऱ्यांच्या नंबरप्लेटचा गेम उघड

स्वतःच्या गाड्यांवर लावली दुसऱ्याची नंबरप्लेट



■नवी मुंबई। प्रतिनिधी,

शासनाचा महसूल चुकवण्यासाठी आणि प्रशासनाची दिशाभूल करण्यासाठी एका ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाने आपल्या ट्रान्सपोर्टमधील गाड्यांवर दुसऱ्याच गाड्यांच्या नंबरप्लेट लावून फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीला आला आहे. मूळ वाहनाच्या मालकाला ट्रफिक पोलिसांचे दंडाचे चालान आल्यानंतर हा प्रकार उघडकीला आला. सानपाडा पोलिसांनी बनावट नंबरप्लेट लावून फसवणूक करणाऱ्या ट्रान्सपोर्ट मालकासह चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करून कारवाई सुरू केली आहे. तक्रारदार शौकत अली अन्सारी यांचा मुंबईत डेकोरेटर्सचा व्यवसाय असून त्यांनी आपल्या व्यावसायासाठी गत फेब्रुवारी महिन्यामध्ये नवीकोरी बोलेरो पिकअप गाडी खरेदी केली होती. ही गाडी एप्रिल महिन्यापर्यंत बॉडी बनवण्यासाठी गॅरेजमध्ये होती. मात्र, गाडी रस्त्यावर येण्यापूर्वीच अन्सारी यांना त्यांच्या मोबाईलवर ट्राफिक पोलिसांचे २ हजार रुपयांचे दंड आल्याचे मेसेज आले. गाडी गॅरेजमध्ये असताना त्यांना दंडाचे चालान आल्याने त्यांनी याचा शोध सुरू केला. या दरम्यान, ५ मे रोजी रात्री अन्सारी यांच्या पिकअप गाडीच्या नंबरची तंतोतंत नंबर प्लेट असलेली दुसरी गाडी अन्सारी यांच्या चालकाला जुईनगर येथे निदर्शनास आली. तेव्हा अन्सारींनी लागलीच पोलिसांना पाचारण केले.

डम्पर थेट ब्रिजला धडकला... महामार्गावर विचित्र अपघात

■वसई। प्रतिनिधी,

वसईतील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रविवारी पहाटे एक धक्कादायक आणि विचित्र अपघात घडला. भरधाव वेगाने धावणाऱ्या डम्परचा मागील डबा अचानक वर गेल्याने वाहन थेट जाऊन लोखंडी ब्रिजला धडकले. धडकेनंतर डम्परची स्थिती इतकी विचित्र झाली की वाहन पुलाच्या लोखंडी संरचनेत अडकून राहिले. या घटनेमुळे महामार्गावर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. वसई तालुक्यातील कोपर फाटा परिसरात मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गावर रविवारी पहाटे हा अपघात घडला. मुंबईहून गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर भरधाव वेगात डम्पर जात असताना अचानक हा अपघात घडला. सुरुवातीला नेमकं काय घडलं हे अनेकांना समजले नाही. मात्र नंतर समोर आलेल्या माहितीनुसार, चालकाकडून चुकून डम्परच्या हायड्रोलिक सिस्टिमचे बटण दाबले गेले. यामुळे डम्परचा मागील डबा अचानक वर उचलला गेला. त्याचवेळी हे डम्पर लोखंडी ब्रिजखालून जात



होते. डबा वर गेल्यामुळे तो थेट ब्रिजच्या लोखंडी संरचनेला जोरात धडकला. धडकेचा जोर इतका मोठा होता की डम्परचा मागील भाग वर अडकला आणि वाहन रास्ता व ब्रिजच्या स्ट्रक्चरमध्ये धोकादायक अवस्थेत अडकून पडले. अपघातानंतर गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या महामार्गावरील एक लेन काही काळासाठी बंद करण्यात आली. त्यामुळे सकाळच्या वेळी वाहानांच्या रांगा लागल्या आणि प्रवाशांना काही काळ वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलीस, महामार्ग प्रशासन आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. क्रेनच्या मदतीने अडकलेला डम्पर बाहेर काढण्याचे काम सुरू करण्यात आले. वाहन हटवण्यासाठी बराच वेळ प्रयत्न सुरू होते. डम्पर ज्या पद्धतीने ब्रिजमध्ये अडकला होता ते पाहता मोठी दुर्घटना घडू शकली असती, मात्र सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिक आणि प्रवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

पुण्याच्या दिशेला निघालेल्या बसवर मोठं संकट, वाशीच्या ब्रिजवर अचानक पेट घेतला

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबईत खासगी बसला आग लागल्याची घटना घडली. या आगीत बसचे मोठे नुकसान झाले आहे. आगीच्या घटनेचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या व्हिडीओत आगीचे आणि धुळीचे मोठमोठे लोळ बघायला मिळत आहेत. व्हायरल होणाऱ्या व्हिडीओतून आग किती भीषण होती याची प्रचिती येत आहे. सुदैवाने या आगीच्या घटनेमुळे कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. आगीची माहिती अद्याप अधिकृतपणे समजू शकलेली नाही. पण जास्त तापमानामुळे बसच्या तापमानात वाढ झाली आणि त्यातून तिला आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वाशीत मुंबईहून पुण्याच्या दिशेला जाणाऱ्या मार्गावर आग लागल्याची घटना घडली आहे. वाशीच्या ब्रिजवर ही घटना घडली आहे. उन्हामुळे बसचे तापमान वाढले आणि त्यामुळे ही आग लागल्याची चर्चा आहे. पण याबाबत अधिकृत अशी कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान, ही घटना



नेमकी कशी घडली? याबाबत पोलिसांकडून तपास केला जात आहे. पोलीस तपासातून याबाबत सविस्तर माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

अग्निशामक दलाकडून शर्थीचे प्रयत्न

आगीच्या घटनेबाबत माहिती मिळताच अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. अग्निशामक दलाच्या पथकाने शर्थीने प्रयत्न करत आगीवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अग्निशामक दलाच्या जवानांना यश देखील आलं. आग विझवल्यानंतर जवानांनी कुलिंगचे काम केले. यानंतर आग पूर्णपणे आटोक्यात आली. पण घटनेत बसचे प्रचंड नुकसान झाले आहे. बस या दुर्घटनेत जळून खाक झाली आहे.

घटनेनंतर परिसरात खळबळ


दरम्यान, बसला आग लागल्याची घटना घडल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. अनेकांनी या घटनेवर चिंता व्यक्त केली. यावेळी रस्ताने जाणाऱ्या इतर प्रवाशांनी थांबून पोलीस आणि अग्निशामक दलाला माहिती दिली. तर काही प्रवाशांनी मोबाईलमध्ये घटनेचे फोटो आणि व्हिडीओ घेतले. हेच फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. या घटनेच्या व्हिडीओमध्ये नागरिकांमध्ये कशाप्रकारे भीती निर्माण झाली होती ते त्यांच्यातील संभाषणातून जाणवत आहे. अर्थात घटनादेखील तितकीच भीषण होती. बसला लागलेली आग ही भीषण होती. या आगीने रौद्ररुप धारण केले होते. अग्निशामक दलाने घटनास्थळी वेळेवर धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला आहे. आग आटोक्यात आली नसती तर महामार्गावर वाहतूक कोंडीचीदेखील समस्या उद्भवू शकली असती. पण प्रशासानाने खूप काळजी घेत परिस्थिती हाताळली. त्यामुळे अनेकांचे जीव वाचले. तसचे नागरिकांना होणारा मनस्ताप देखील वाचला.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

महागाईच्या दुहेरी संकटाचे सावट



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी शेतीसंबंधी दोन महत्त्वाच्या बैठका घेतल्या. त्यातही पहिली राज्यस्तरीय खरीप हंगाम आढावा बैठक होती, तर दुसरी बैठक राज्यस्तरीय बँकर्स समितीची होती. या दोन्ही बैठकीच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार शेतीला बसणारा अल निनोचा फटका, कृषी पीक कर्जवाटप आणि शेतकर्यांसमोरील अडचणींवर भाष्य केले. सध्या देश मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. आखातातील संघषार्मुळे देश इंधन, खत टंचाईच्या काठावर उभा आहे. भरमसाठ पैसे खर्च करून सरकारला देशवासीयांची इंधन गरज भागवावी लागत असल्याने पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना काटकसरीचा सल्ला दिलेला आहे. देशात विविध पातळीवर काटकसर सुरू असताना पेट्रोल-डिझेल आणि गॅसचे दर आतापर्यंत दोनदा वाढलेत. यामुळे सर्वसामान्यांच्या दारात महागाई आ वासून उभी आहे. त्यातच अल निनोच्या प्रभावामुळे देशात सरासरीच्या 92 टक्केच पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने चालू वर्ष भारतासाठी आव्हानात्मक जाणार असल्याचे चित्र आहे. एका अथार्ने भारतीय अर्थव्यवस्थेसमोर महागाईचे दुहेरी संकट उभे ठाकले आहे. अल निनो आणि ला निना या जागतिक हवामानविषयक संकल्पना आहेत, ज्याचा थेट परिणाम जगभरातील आणि विशेषतः भारताच्या हवामानावर अर्थात मान्सूनमुळे तयार होर्णाया पावसावर होतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, प्रशांत महासागरातील समुद्राचे पाणी नेहमीपेक्षा जास्त गरम होण्याच्या प्रक्रियेला अल निनो आणि हेच पाणी नेहमीपेक्षा जास्त थंड होण्याच्या प्रक्रियेला ला निना म्हणतात. ला निना देशासाठी फायदेशीर मानला जातो, कारण यामुळे भारतात सरासरीपेक्षा जास्त आणि चांगला पाऊस पडतो. परंतु, अल निनो आपल्यासोबत टेन्शनचे वातावरण घेऊन येतो. अल निनोमुळे तापमान सरासरीपेक्षा अधिक वाढून उन्हाचा कडाका जाणवतो. ज्याची दाहकता सध्या आपण सर्वच जण अनुभवत आहोत. विदर्भ मराठवाड्यात पारा 47 अंशांवर जाऊन पोहोचला आहे. देशातील अनेक भागांत तापमानाने उच्चांक गाठला आहे. त्यामुळेच शेतकर्यांसह सर्वसामान्य पावसाची चातकासारखी वाट बघत असताना अल निनो पाऊस टंचाईचा कटू निरोप घेऊन आला आहे. अल निनोचा थेट संबंध मान्सूनच्या पावसाशी असल्यामुळे भारतीय शेतीवर त्याचे अत्यंत गंभीर आणि दूरगामी परिणाम होण्याची चिन्हे आहेत. उष्णतेच्या लाटांमुळे कृषी उत्पादनाला फटका बसू शकतो. भारत हा शेतीप्रधान देश असल्याने अल निनोमुळे शेतीचे अर्थकारण मोठ्या प्रमाणावर बिघडू शकते. महाराष्ट्राच्या बाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली माहिती आगामी धोक्याची जाणीव करून देणारी आहे. राज्यात यंदाच्या खरीप हंगामावर अल निनोचे मोठे सावट असून त्यामुळे राज्यात सरासरी ८८ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज आहे. त्यातही पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांवर अवर्षणाचे संकट घोंगावत आहे. मध्य पूवेर्तील युद्धामुळे रासायनिक खतांच्या तुटवड्याचा शेतकर्यांना फटका बसू शकतो, अशी भीती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. भारतातील तांदूळ, कापूस, सोयाबीन, मका, तूर आणि भुईमूग आदी खरीपाची पिके पूर्णपणे मान्सूनच्या पावसावर अवलंबून असतात. पाऊस लांबल्यास पेरण्या खोळंबण्याची किंवा पाऊस लवकर गायब झाल्यास उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. आधीच उन्हाच्या तीव्रतेमुळे राज्याच्या ग्रामीण भागात पाणीटंचाईचे गंभीर संकट उद्भवले आहे. आजच्या घडीला राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १ हजार ६५२ तहानलेल्या वाड्यांना ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. राज्यात उन्हाचा कडाका कायम राहिल्यास येत्या काही दिवसात पाणीटंचाईचा सामना करर्णाया गावांची आणि वाड्यांची संख्या आणखी वाढू शकते. त्यातच पाऊस कमी झाल्यास नद्या, विहिरी, बोअरवेल आणि धरणांमधील पाणीसाठा लवकर आटून खरीपासोबतच रब्बी पिकांनाही त्याचा फटका बसू शकतो. शेती उत्पादन कमी झाल्यास बाजारात अन्नधान्य, भाज्या, डाळींची आवक कमी होईल. अन्नधान्याच्या किमती वाढल्यास महागाई आणखी भडकू शकते. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामात पिकांचे नियोजन आणि पाण्याचे व्यवस्थापन सरकारला करावे लागणार आहे. त्यात नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवारअंतर्गत जलसंधारणाची कामे वेळेत पूर्ण करणे, शेतकर्यांना वेळेवर मुबलक प्रमाणात बी-बियाणे, खते उपलब्ध करून देणे आवश्यक ठरेल. मुख्यमंत्र्यांनी बँकर्स समितीच्या बैठकीत राष्ट्रीयीकृत बँका शेतकर्यांना पीक कर्ज देण्यात गांभीर्य दाखवत नाहीत, अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्यात मोठ्या प्रमाणावर तथ्यही आहे. त्यामुळे ८० टक्क्यांच्या वर पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याची सूचना करताना शेतकऱ्यांकडे सिबिलची मागणी न करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या बँकांना दिले ते बरेच झाले. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार 30 जूनआधी नुकसानग्रस्त शेतकर्यांना कर्जमाफी मिळाल्यास मोठा दिलासा मिळेल. शेतकरी हा केवळ आपला अन्नदाता नाही तर अर्थचक्र सुरळीत ठेवणारा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाही आहे. इंधन दरवाढ मालवाहतूक महाग होण्यास कारणीभूत ठरेल. याचा थेट परिणाम म्हणून दूध, भाजीपाला, फळे आणि किराणा माल यांसारख्या दैनंदिन गोष्टींचे भाव कडाडतील. परिणामी देशात महागाई वाढणे अपरिहार्यच आहे. मात्र, देशातील शेतकर्यांनी पाण्याच्या योग्य व्यवस्थापनाच्या आधारे पुरेसे पिकपाणी घेतल्यास या भडकर्णाया महागाईला वेसण घालता येईल. म्हणूनच देशावरील दुहेरी संकट निवारण्याची मोठी जबाबदारी आता शेतकर्यांवर असेल.

जलसंकटाला भिडताना...

महाराष्ट्रातील पाणीसंकट हे केवळ पावसाच्या कमतरतेमुळे नव्हे, तर व्यवस्थापनातील त्रुटींमुळे गंभीर झाले आहे. पिण्याचे पाणी आणि पशुधनाचे पाणी यांना सर्वोच्च प्राधान्य देऊन उर्वरित वापराचे नियोजन गरजेचे आहे.



यंदाचा उन्हाळा तापमानाचे वेगवेगळे विक्रम मोडणारा आहे. त्यामुळे पाणीसाठ्यांवर गंभीर परिणामही दिसत आहेत. मुंबई शहरात १० टक्के पाणीकपात जाहीर केली आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला राज्यातील एकूण उपयुक्त पाणीसाठा सुमारे ३७ टक्क्यांवर आला असून जवळपास ६२ टक्के साठा रिकामा आहे. बहुतांश भागात तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअस दरम्यान असल्यामुळे पाण्याचा वापर सरासरी १५ ते टक्क्याने वाढलेला आहे. याचवेळी धरणांमधील बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढून दररोज सुमारे ०.३ ते ०.५ टक्के साठा कमी होताना दिसतो. उपलब्ध पाणी केवळ वापरामुळे नव्हे, तर नैसर्गिकरीत्या देखील झपाट्याने घटत आहे. विभागनिहाय पाहता विदभार्तील काही भागांत तुलनेने साठा समाधानकारक असला तरी पुणे विभागात तो ३० टक्क्यांच्या खाली गेल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे, तर मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातही मध्यम ते उच्च जोखीम निर्माण झाली आहे.

राज्यातील सहा महसुली विभाग, सुमारे ४४ हजार गावे तसेच नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांतील कोट्यवधी लोकसंख्या ही मोसमी पावसावरच अवलंबून आहे. महाराष्ट्रातील प्रमुख जलाशयांवर राज्यातील मोठी लोकसंख्या अवलंबून आहे. मुंबई महानगर प्रदेशातील सुमारे २.३० कोटी लोकसंख्या, तसेच पुणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर यांसारखी शहरे आणि हजारो गावे जलाशयांवर पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून आहेत. एकूण सुमारे सात कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या जलाशयांवर थेट किंवा अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे.

राज्यात सुमारे २.२५ कोटी हेक्टर क्षेत्र शेतीखाली असून त्यातील मोठा भाग अजूनही पावसावर अवलंबून आहे. सिंचनाखालील क्षेत्र मर्यादित असल्याने पावसातील खंडाचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. मृग नक्षत्रात पाऊस झाला नाही, तर दुबार पेरणीचे संकट उभे राहू शकते. त्यामुळे जलाशयांतील पाणीपातळी कमी झाली की त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रांवर होतो. राज्यातील सिंचन व्यवस्थेचे स्वरूप पाहता भूजलावर असलेले प्रचंड अवलंबित्व स्पष्ट होते. लघुसिंचन पाहणी (२०१३-१४) नुसार महाराष्ट्रात विहिरी आणि ट्युबवेल असे एकूण २६ लाख भूजल स्रोत आहेत. पावसातील अनिश्चितता वाढली की भूजलसाठ्यावर ताण वाढतो आणि जलपातळी झपाट्याने खाली जाते. विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील भागात खोल कूपनलिकांची (सुमारे ५०० फुटांपेक्षाही अधिक) संख्या वाढत असल्याने जलस्रोतांची दीर्घकालीन शाश्वतता धोक्यात येत आहे. जलशक्ती मंत्रालयाने २०२२ साली पहिली जलस्रोत गणना केली. त्यानुसार एकूण ९७,०६२ जलस्रोत असून ९६,३४३ जलस्रोत ग्रामीण भागात आहेत. त्यापैकी ५१,९५९ शासकीय मालकीचे आहेत तर ४१,३५१ हे पंचयातींच्या अखत्यारीत येतात.

भूजलावर राज्याचा मोठा भार आहे. सुमारे २६ लाखांहून अधिक विहिरी आणि कूपनलिका कार्यरत असून तोच शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मोठा स्रोत आहे. भूजलाचा अधिक उपसा होत असल्याने, अनेक भागांत भूजल पातळी सातत्याने खाली जात आहे. घटती भूजल पातळी आणि तलावांतील झपाट्याने कमी होत असलेला जलसाठा या चिंतेच्या बाबी आहेत. दुसरीकडे, राज्यातील ५४ नदीपट्टे प्रदूषित असल्यामुळे उपलब्ध पाणीही वापरण्यास अयोग्य ठरत आहे. त्यामुळे पाण्याची कमतरता आणि पाण्याची गुणवत्ता या दोन्ही समस्या गंभीर बनल्या आहेत.

जे जुने जलाशय आहेत अथवा लघुसिंचन/कोल्हापूर पद्धतीचे बंधारे/ तलाव आहेत, त्यांची मोठ्या प्रमाणावर तूटफूट झाली असून या परिस्थितीमुळे जलाशयांतील साठा टिकून राहत नाही आणि भूजल पुनर्भरण कमी होते. उन्हाळ्याच्या अखेरीस अनेक धरणांतील पाणीपातळी २० ते ३० टक्क्यांपर्यंत खाली येते, विशेषतः मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात ही स्थिती अधिक गंभीर असते.

पिण्याचे पाणी आणि गुरांसाठीचे पाणी हा प्राधान्यक्रम असतो. त्यानंतरच शेती, उद्योग आणि इतर वापराचा विचार करणे आवश्यक आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा ही केवळ तात्पुरती उपाययोजना आहे. टँकरने पाणी देण्यासाठीही पाण्याचा स्रोत जवळ असणे अत्यंत गरजेचे आहे; अन्यथा वाहतूक खर्च वाढतो आणि पुरवठा अनियमित होतो. त्यामुळे स्थानिक पातळीवर जलस्रोतांचे जतन आणि जवळच्या स्रोतांचा वापर ही महत्त्वाची बाब आहे. पिण्यासाठी टँकरने पाणी आणि गुरांसाठी छावण्या असे चित्र दिसायला नको.

एकूणच महाराष्ट्रातील पाणीसंकट हे केवळ पावसाच्या कमतरतेमुळे नव्हे, तर व्यवस्थापनातील त्रुटींमुळे अधिक गंभीर झाले आहे. पिण्याचे पाणी आणि पशुधनाचे पाणी यांना सर्वोच्च प्राधान्य देत, उर्वरित वापराचे नियोजन केले तरच या संकटावर मात करता येईल. अन्यथा, येणाऱ्या काळात पाणीटंचाई हे मोठे सामाजिक आणि आर्थिक संकट ठरू शकते.

राज्यातील जलस्रोतांच्या व्यवस्थापनात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारत सरकारच्या 'वॉटर बॉडी सेन्सस'नुसार महाराष्ट्रातील जलस्रोतांची संख्या मोठी असली तरी त्यांचा कार्यक्षम वापर मर्यादित आहे. या पार्श्वभूमीवर ७३ व ७४ व्या घटनादुरुस्ती अंतर्गत ग्रामपंचायत आणि नागरी संस्था यांना जलव्यवस्थापनाची स्पष्ट जबाबदारी देण्यात आली आहे. गाव पातळीवर जलस्रोतांची नोंद, गाळ काढणे, पाणलोट व्यवस्थापन आणि पाणी बजेट तयार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नगरपातळीवर जलसंधारण, गळती नियंत्रण, सांडपाणी पुनर्वापर आणि पावसाच्या पाण्याचे संकलन या बाबी नगर आराखड्यात अनिवार्य करणे गरजेचे आहे. जलस्रोतांचे संरक्षण आणि शाश्वत वापर सुनिश्चित करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सक्रिय भूमिका बजावणे ही काळाची गरज आहे.

मागील दशकात राज्याने पाणीपुरवठ्यावर भर देण्याऐवजी पाणी कमावणे आणि त्याचा योग्य वापर अशी भूमिका घेतल्याचे दिसते. राज्य शासनाच्या २०१५ ची जलयुक्त शिवार योजना, त्यानंतरची गाळमुक्त तलाव आणि गाळयुक्त शिवार, जलयुक्त शिवर ३.० आणि नुकताच राज्याने घेतलेला नदी प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय तसेच राज्याने २९ एप्रिल रोजी एकात्मिक जलव्यवस्थापन राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय अशा काही जलयोजना दिसतात. हे धोरणात्मक निर्णय तर योग्य आहेत, पण प्रत्यक्षात म्हणावे तसे बदल दिसत नाहीत. जलसाक्षरता आणि 'चला जाणू या नदीला' हे नदी साक्षरता अभियान असे विषय अनुपयुक्त न समजता ते या धोरणात्मक निर्णयांशी पूरकच आहेत म्हणून त्यांना जोडून घेणे गरजेचे आहे.

एल-निनोच्या पार्श्वभूमीवर यंदा पावसात खंड पडण्याची शक्यता आहे; मात्र केवळ एल-निनोच नव्हे तर गेल्या काही वर्षांत पावसाचा स्वभावच बदललेला दिसतो. कमी कालावधीत अतिवृष्टी आणि नंतर दीर्घ खंड अशी पावसाची पद्धत निर्माण झाली आहे. याचा थेट परिणाम मातीच्या गुणवत्तेवर झाला असून मातीची पाणीधारण क्षमता घटली आहे. परिणामी, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी वाहून जाते आणि भूजल पुनर्भरण कमी होते. दुसरीकडे शेती आणि नागरी भागातील पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे विहिरी व ट्युबवेल्सवर ताण वाढत असून भूजल पातळी सातत्याने खाली जात आहे. अशा परिस्थितीत 'दुष्काळात तेरावा महिना' या म्हणीप्रमाणे, पावसातील खंड आणि भूजल घट यांचा दुहेरी परिणाम राज्यावर दिसून येत आहे.

साटेलोटे आणि दिरंगाईचे बळी



गेले तीन दिवस मुंबईच्या वांद्रे उपनगरात रेल्वेमागार्ला खेटून असलेल्या गरीब नगरातील बेकायदा झोपड्यांवरील कारवाई चचेर्चा विषय ठरली आहे. सुमारे ४०० झोपड्यांच्या दाटीवाटीने ५२०० चौरस मीटरचा हा भूखंड व्यापलेला होता. कारवाईची कुऱ्हाड कोसळल्यानंतर येथील जमावाने पोलिसांवर व अतिक्रमणविरोधी पथकांवर बाटल्या, दगडांचा मारा सुरू केला. आजवर मुंबईत कोणत्याही बेकायदा बांधकामांवरील कारवाईप्रसंगी हाच प्रकार घडत आला आहे. अशा वेळी बऱ्याचदा प्रार्थनास्थळांचा आसराही घेतला जातो व या भागातही प्रार्थनास्थळ बांधण्यात आले होते. रेल्वेच्या जागेवरील ही अतिक्रमणे हटविण्यासाठी तब्बल नऊ वर्षे न्यायालयीन लढा दिल्यानंतर कारवाईचा मार्ग मोकळा झाला. रेल्वेमागार्ला खेटून असलेल्या या झोपड्या सुरक्षेच्या दृष्टीनेही चिंतेच्या ठरल्या होत्या. अतिक्रमणांमुळे वांद्रे टर्मिनसपर्यंत पोहोचल्याने त्याचा विस्तार कुंठित झाला होता. कित्येक झोपड्यांमध्ये शिलाई किंवा तत्सम उद्योगांनीही ठाण मांडले होते. लोहमार्ग चिंध्या व इतर कचऱ्यामुळे बकाल झाला होता. काही वर्षांपूर्वी गॅसच्या सिलिंडरची साठवणूक केल्यामुळे आग लागून लोकांच्या जिवाशी खेळ झाला होता. तीन ते चार मजली झोपड्या उभ्या राहीपर्यंत पालिका व रेल्वे अधिकाऱ्यांना काही कळले नाही, हे अजब आहे. येथील बहुतांश रहिवाशांना वीजजोडणी, शिधावाटप कार्डे व मतदार ओळखपत्रेही मिळाली होती. यावरून बेकायदा बांधकामे उभी करण्यात स्थानिक राजकारणी, पालिका अधिकारी, या भूखंडाची मालक असलेली रेल्वे यांचे साटेलोटे कारणीभूत ठरले, हे स्पष्ट होते. अभिनेते व काँग्रेसचे दिवंगत खासदार सुनील दत्त हे या परिसरातील व्होटबँकेच्या पाठीशी उभे राहिले होते. खेदाची बाब म्हणजे स्थानिक नगरसेवक, आमदार, खासदार अशा सर्वांनीच या परिसराकडे कायम केवळ एक मतपेटी म्हणून पाहिले. रहिवाशांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी, यासाठी कुणी प्रयत्न केले नाहीत. रेल्वे किंवा मुंबई पोर्ट ट्रस्टसारख्या केंद्रीय यंत्रणा तसेच राज्याची जिल्हाधिकारी यंत्रणा यांनी आजवर त्यांच्या मालकीच्या कित्येक भूखंडांच्या जपणुकीकडे कायम डोळेझाक केली, कारवाईच्या बाबतीत दिरंगाई केली किंवा संगनमत करून आपले खिसे भरण्याच्या बदल्यात बेकायदा व्यवहारांना पंखाखाली घेतले.

भाषणांचा अमृतकाळ, जनतेसाठी संकटकाळ

देशाला आज घोषणांची नव्हे, तर ठोस आर्थिक निर्णयांची गरज आहे. रोजगारनिर्मिती, गुंतवणुकीला चालना, कराचा बोजा कमी करणे, इंधन दरांवर नियंत्रण, रुपयाला स्थैर्य आणि सामान्य नागरिकाच्या क्रयशक्तीचे संरक्षण हीच खरी आर्थिक पुनर्बांधणीची दिशा ठरू शकते.



देशातील जनतेला पेट्रोल-डिझेल कमी वापरण्याचा सल्ला द्यायचा, सोने खरेदी टाळण्याचे आवाहन करायचे, परदेश प्रवासावर संयम ठेवण्याचे उपदेश करायचे आणि दुसरीकडे पंतप्रधानांसह सत्ताधाऱ्यांनी विदेशी दौरे, भव्य रोड शो, प्रचार मोहिमा आणि सत्तेच्या झगमगाटात रममाण राहायचे, हा विरोधाभास आता देशातील जनतेला स्पष्टपणे दिसू लागला आहे. वाढती महागाई, बेरोजगारी, रुपयाची घसरण, इंधन दरवाढ, गुंतवणुकीतील घट आणि आर्थिक अस्थिरता यामुळे सामान्य नागरिक होरपळत असताना सरकारकडून मात्र 'जागतिक संकट', 'युद्धजन्य परिस्थिती' आणि ह्यग्लोबल फॅक्टर्स' या कारणांचा आधार घेतला जात आहे. परंतु आजची परिस्थिती केवळ बाह्य जागतिक संकटांमुळे निर्माण झालेली नाही; तर गेल्या बारा वर्षांतील ढिसाळ कारभार, चुकीची आर्थिक धोरणे आणि अपयशी परराष्ट्र नीती यांचे हे थेट परिणाम आहेत.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सातत्याने देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत गंभीर इशारे देत आले आहेत. नोटाबंदीच्या काळात त्यांनी व्यक्त केलेल्या चिंता पुढे वास्तव ठरल्या. कोरोनाच्या काळात स्थलांतरित मजूर, बेरोजगारी, लघुउद्योगांची पडझड आणि आर्थिक मंदी याबाबत त्यांनी व्यक्त केलेले इशारेही खरे ठरले. आज पुन्हा इराण-इस्रायल-अमेरिका संघर्ष, जागतिक युद्धजन्य तणाव आणि तेल बाजारातील अस्थिरता यांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी व्यक्त केलेल्या आर्थिक चिंताही वास्तवात उतरताना दिसत आहेत. मात्र प्रचारतंत्र आणि प्रतिमा व्यवस्थापनात गुंतलेल्या सरकारने या इशाऱ्यांकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले.

गेल्या बारा वर्षांतील इंधन दरवाढीची आकडेवारी या संकटाची तीव्रता अधोरेखित करते. या काळात पेट्रोलच्या किमतीत ३८%, तर डिझेलच्या किमतीमध्ये तब्बल ६२% टक्क्यांची वाढ झाली आहे. २०१४ मध्ये पेट्रोल ७० रुपयांच्या आसपास आणि डिझेल ५५ रुपयांच्या आसपास होते. आज पेट्रोल १०० ते ११० रुपयांच्या दरम्यान पोहोचले असून डिझेल ९० रुपयांच्या पुढे गेले आहे. घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत २०१४ मध्ये ४१४ रुपये होती; ती आता ९१५ रुपयांवर पोहोचली आहे. म्हणजेच तब्बल १२१ टक्के वाढ. 'अच्छे दिन'च्या घोषणा करणाऱ्या सरकारच्या काळात जनता महागाईचे 'बुरे दिन' अनुभवत आहे.

महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, या संपूर्ण काळात जग कायम युद्धस्थितीत होते का? आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती नेहमीच प्रचंड वाढलेल्या होत्या का? तर याचे उत्तर नाही असे आहे. गेल्या १२ वर्षांत कच्च्या तेलाच्या किमती ५० ते ५५ डॉलर प्रति बॅरलच्या आसपास होत्या. डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात कच्च्या तेलाच्या किमती १०० डॉलर प्रति बॅरलपर्यंत गेल्या होत्या; तरी पेट्रोल-डिझेलचे दर ६५-७० रुपयांच्या पुढे जाऊ दिले नव्हते. आज मात्र कच्चे तेल तुलनेने स्वस्त असतानाही देशात पेट्रोल-डिझेलचे दर ऐतिहासिक उच्चांकावर कायम आहेत.

दरवाढीचे सर्वात मोठे कारण म्हणजे केंद्र सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवर लावलेले प्रचंड कर आणि अबकारी शुल्क. गेल्या बारा वर्षांत केंद्र सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवरील करातून तब्बल ४३ लाख कोटी रुपयांची वसुली केली. सामान्य नागरिक महागाईने होरपळत असताना तेल कंपन्यांनी मात्र विक्रमी नफा कमावला.

इंधन दरवाढीचा परिणाम केवळ वाहनधारकांपुरता मर्यादित राहत नाही. वाहतूक खर्च वाढतो, शेती महागते, उत्पादन खर्च वाढतो. त्यामुळे सर्वच वस्तूंच्या किमती वाढतात. दूध, खाद्यतेल, भाजीपाला यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंपासून ते हॉटेल उद्योग, लघुउद्योग, बांधकाम साहित्य, शालेय वाहतूक आणि आरोग्य सेवा अशा सर्वच क्षेत्रांवर या वाढीचा थेट परिणाम झाला आहे. मध्यमवर्गीय कुटुंबाच्या मासिक बजेटमधील सर्वात मोठा हिस्सा आज इंधन आणि जीवनावश्यक वस्तूंवर खर्च होत आहे. उत्पन्नवाढीचा वेग मंदावलेला असताना खर्च मात्र सातत्याने वाढत असल्याने सामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

रुपयाची घसरण हे अर्थव्यवस्थेतील कमकुवतपणाचे आणखी एक गंभीर लक्षण आहे. २०१४ मध्ये डॉलरच्या तुलनेत रुपया ६०-६२ च्या आसपास होता. आज रुपया ९६-९७ च्या पातळीवर पोहोचला आहे. भारत मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक्स आणि औद्योगिक कच्चा माल आयात करतो. त्यामुळे रुपयाच्या घसरणीचा थेट परिणाम महागाईवर होतो. याच काळात भारताच्या परकीय चलन साठ्यात सुमारे ३८ अब्ज डॉलरची घट झाली. परदेशी गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून आणि भारतीय अर्थव्यवस्थेतून जवळपास दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली. गुंतवणूकदारांचा अर्थव्यवस्थेवरील विश्वास कमी होणे हे कोणत्याही देशासाठी धोक्याचे संकेत मानले जातात.

गुंतवणूक घटली की उद्योग विस्तारत नाहीत, रोजगारनिर्मिती थांबते. आज बेरोजगारी देशासमोरील सर्वात मोठे संकट आहे. बेरोजगारी दर १५ टक्क्यांच्या पुढे गेला आहे. शहरी बेरोजगारीने गंभीर स्वरूप धारण केले आहे. ग्रामीण भागात शेतीतील घटते उत्पन्न, रोजगार हमी योजनांवरील मर्यादित खर्च आणि वाढती महागाई यामुळे परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. देश गेल्या ४५ वर्षांतील सर्वात गंभीर बेरोजगारीचा सामना करत आहे.

सरकार रोजगारनिर्मितीसाठी विविध योजनांचा मोठा प्रचार करते; पण त्यांच्या अंमलबजावणीतील वास्तव वेगळेच चित्र दाखवते. जनधन योजनेंतर्गत ५८ कोटी खाती उघडण्यात आली; पण त्यापैकी १५ कोटी खाती निष्क्रिय आहेत. सुमारे ६२ टक्के खात्यांमध्ये एक हजार रुपयांपेक्षा कमी शिल्लक आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील थकीत कर्जाचे प्रमाण १० टक्क्यांच्या पुढे गेले आहे. प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेत पहिल्या टप्प्यात केवळ ७.३४ टक्के उमेदवारांनी इंटर्नशिप पूर्ण केली, तर ४१ टक्के उमेदवारांनी अर्धवट सोडून दिली.


या संपूर्ण परिस्थितीत सर्वात मोठा प्रश्न निर्माण होतो तो सरकारच्या प्राधान्यक्रमांबद्दल. देश आर्थिक संकटाच्या छायेत उभा असताना सरकारचे संपूर्ण लक्ष प्रतिमा व्यवस्थापनावर केंद्रित असल्याचे दिसते. 'अमृतकाल', 'विश्वगुरू', 'पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था', 'विकसित भारत' अशा घोषणांमधून देशाचे एक झगमगते चित्र उभे करण्यात आले. प्रचारतंत्राच्या मदतीने देशाच्या स्थितीचे एक कृत्रिम आणि सोनेरी चित्र रंगवण्यात आले; पण वास्तव मात्र पूर्णपणे वेगळे आहे. महागाईने होरपळणारा मध्यमवर्ग, रोजगारासाठी भटकणारे तरुण, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले शेतकरी, वाढती आर्थिक विषमता आणि कमी होत चाललेली क्रयशक्ती हेच आजच्या भारताचे खरे चित्र आहे.

प्रचाराच्या जोरावर काही काळ वास्तव झाकता येऊ शकते; पण स्वयंपाकघरातील वाढते खर्च, पेट्रोल पंपावरील वाढती बिले, रोजगाराचा अभाव, रिकामी होत चाललेली पाकिटे आणि भविष्याबाबतची असुरक्षितता हे वास्तव कायम लपवता येत नाही. जनतेला 'त्याग करा', 'काटकसर करा', 'इंधन कमी वापरा' असे उपदेश दिले जात असताना सत्ताधाऱ्यांच्या जीवनशैलीत मात्र कोणताही बदल दिसत नाही. हीच बाब सामान्य माणसाच्या मनात तीव्र असंतोष निर्माण करत आहे.

देशाला आज घोषणांची नव्हे, तर ठोस आर्थिक निर्णयांची गरज आहे. रोजगारनिर्मिती, गुंतवणुकीला चालना, कराचा बोजा कमी करणे, इंधन दरांवर नियंत्रण, रुपयाला स्थैर्य आणि सामान्य नागरिकाच्या क्रयशक्तीचे संरक्षण हीच खरी आर्थिक पुनर्बांधणीची दिशा ठरू शकते. अन्यथा 'अमृतकाल'च्या घोषणा सुरू राहतील; पण सामान्य जनतेसाठी हा काळ आर्थिक संघर्ष, असुरक्षितता आणि वाढत्या निराशेचाच संकटकाळ ठरेल.

कधीतरी उपमा जास्त होतो आणि उरतो. मग तो गारगुट्ट उपमा कोणीच खात नाही. काही वेळा ताजा उपमाही उरतो. कारण तो दडदडीत किंवा घट्ट होतो जो अजिबात खाल्ला जात नाही. अशा वेळी हा उपमा फुकट घालवण्यापेक्षा त्यापासून एक भन्नाट नाश्त्याचा पदार्थ बनवला तर...

उपमा कटलेट्स



साहित्य – उरलेला उपमा १ वाटी (त्यात काजू असतील तर काढून टाका.) उकडलेला आणि किसलेला बटाटा अर्धी वाटी, चाट मसाला, आवडीप्रमाणे तिखट, थोडा ओवा, मीठ, साखर.

कृती – सर्व साहित्य एकत्र करून घ्यावे. लक्षात ठेवा मिश्रण पातळ नको तर घट्ट हवं. त्याचे छोटे छोटे गोळे अथवा टिक्की करून आवडीप्रमाणे तळून किंवा भाजून घ्यावे. याच्या टिक्की किंवा कटलेट नीट वळता येत नसतील तर अर्धा तास ते मिश्रण फ्रीजमध्ये उघडे ठेवावे.

आपल्या चेहऱ्याची काळजी घेताना चेहरा नेहमी सुंदर आणि त्वचा नितळ, चमकदार राहावी, अशी इच्छा केवळ स्त्रियांनाच नाही, तर पुरुषांनाही असते. त्यामुळे 'फेशियल', किंवा फेशियल क्लीनअप व मसाज ही थेरपी लोकप्रिय आहे. चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्याबरोबरच चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करत त्वचेवरील मृत पेशी, ब्लॅक हेड्स आणि व्हाईट हेड्स नाहीसे करण्याचे काम फेशियल थेरपी करत असते. मात्र ही थेरपी घेताना योग्य काळजी घेतली गेली नाही, तर चेहऱ्याला नुकसान होण्याची शक्यताच अधिक असते. त्यामुळे फेशियल थेरपी निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

फेशियल करताना अशी घ्या काळजी



काही लोकांची त्वचा तेलकट असते. अशा व्यक्तींना चेहऱ्यावर मुरुमे अधिक येत असतात. अशा व्यक्तींच्या फेशियल थेरपीसाठी तेलयुक्त क्रीम्स वापरली गेली, तर त्वचा अधिक तेलकट होऊन मुरुमे वाढू शकतात.

तेलयुक्त क्रीम्स वापरली गेल्याने त्वचेवरील रंध्रे बंद होऊन पिंपल्स येण्याचे प्रमाण वाढू शकते. तेलकट त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी फेशियलसाठी वॉटर बेस्ड क्रीम्सचा वापर करणे चांगले.

फेशियल थेरपीसाठी वापरण्यात येणारे प्रोडक्ट आपल्या नेहमीच्या वापरातील नसून, नवे असल्यास त्याची 'पॅच टेस्ट' करून पाहणे चांगले. या टेस्टद्वारे आपण वापरणार असलेल्या क्रीमचे कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम आपल्या त्वचेवर होणार नाहीत याची खात्री आपल्याला करून घेता येते. ही टेस्ट करण्यासाठी थोडेसे क्रीम आपल्या मनगटाच्या आतील बाजूस लावून पाहावे. चोवीस तासांच्या नंतर या क्रीमचा कोणताही दुष्परिणाम जाणवला नाही, तरच हे क्रीम चेहऱ्यावर लावण्यास योग्य आहे, असे समजून त्याचा फेशियल थेरपीसाठी वापर करावा.



फेशियल थेरपी एखाद्या ब्युटी सलोनमध्ये किंवा पार्लरमध्ये जाऊन करणार असल्यास तेथील स्वच्छता, फेशियलच्या दरम्यान वापरण्यात येणारे टॉवेल, नॅपकिन, स्टीमर आणि इतर उपकरणे स्वच्छ असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

जर या वस्तू स्वच्छ आणि निर्जंतुक केलेल्या नसतील तर त्याद्वारे त्वचेला इन्फेक्शन होण्याचा धोका असतो.

तसेच फेशियल करताना आपल्यासाठी वापरण्यात येणारे फेशियल कीट संपूर्णपणे नवीन आणि आधीपासून वापरलेली नाही याची खात्री करून घ्यावी.

आजकाल फेशियल कीटमध्ये सर्व प्रसाधने लहान लहान पाऊचेसमध्ये उपलब्ध असल्याने प्रोडक्ट आधी वापरले गेले आहे किंवा नाही याची सहज खात्री करून घेता येते.

फेशियलसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रसाधानांमध्ये किंवा क्रीम्समध्ये अनेक प्रकारची रसायने असतात. या रसायनांमुळे त्वचा कोरडी होणे, त्वचेला खाज सुटणे, त्वचा लालसर होणे, अशा समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे फेशियलसाठी शक्यतो संपूर्णपणे नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे केव्हाही चांगले. फेशियल थेरपी केल्यानंतर उन्हामध्ये बाहेर पडणे किंवा साबणाचा वापर टाळावा. फेशियल थेरपीनंतर त्वरित सौंदर्यप्रसाधनांचा वापरही करू नये. फेशियल केल्यानंतर त्वचेची रंध्रे खुली असतात. त्यामुळे सौंदर्य प्रसाधानांमधील रसायने या रंध्रांच्या वाटे त्वचेच्या आत शिरून त्वचेचे नुकसान करू शकतात.

फेशियलनंतर चेहरा धुण्यासाठी साबण किंवा फेसवॉशचा वापर न करता केवळ थंड पाण्याने चेहरा धुवावा.

घरचा वैद्य
जाणून घ्या ५ उपाय



▮ **कांदा** – कानाच्या वेदनेमुळे त्रस्त आहात, तर घाबरण्यासारखे काही नाही. कांद्याच्या रस काढून कापसाच्या मदतीने कानात दोन ते तीन थेंब टाका. काही वेळातच आराम मिळेल.

▮ **हळद** – शारीरिक वेदनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी गरमागरम दुधात हळद मिसळून सेवन करा. याव्यतिरिक्त तेल आणि हळद गरम करून शरीरावर लावल्यानेही लाभ मिळेल.

▮ **लसूण** – हे अँटीबॅक्टेरिअल आणि अँटी इंफ्लेमेटरी तत्त्वाने भरपूर औषध आहे, ज्याने उष्णताही प्राप्त होते. शारीरिक वेदनेत लसूण सर्वोत्तम विकल्प आहे. याव्यतिरिक्त कानात वेदना होत असल्यास लसणाच्या तेलाचे काही थेंब टाकल्याने आराम मिळतो.

▮ **लवंग** – दातदुखीवर लवंग सर्वोत्तम उपाय आहे. भाजलेल्या लवंगाची पेस्ट किंवा लवंग तेल कापसाने दाताला लावल्याने वेदनांपासून मुक्ती मिळेल.

▮ **दालचिनी** – याने विशेषतः महिलांना मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळते. अधिक रक्तस्राव होत असल्यास दालचिनी लाभकारी ठरेल. केवळ दालचिनी टाकून चहा बनवा किंवा तयार चहामध्ये दालचिनी पावडर टाकून सेवन करा.

कर्करुग्णांसाठी जीवनसत्त्व 'ड' लाभदायक

कर्करोग झालेल्यांनी किमान तीन वर्षे नियमितपणे जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेतल्यास ते जगण्याचा कालावधी आणखी काही वर्षे वाढू शकतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे. याबाबत अमेरिकेतील मिशिगन स्टेट विद्यापीठातील संशोधकांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जीवनसत्त्व 'ड'मुळे हाडे मजबूत होण्याबरोबरच आणखीही महत्त्वपूर्ण लाभ होतात.

मिशिगन स्टेट विद्यापीठाचे तारेक हायकल यांनी सांगितले की, जीवनसत्त्व 'ड'च्या सेवनामुळे कर्करोग झालेल्या व्यक्तींमध्ये मृत्यूची जोखीम कमी झाल्याचा परिणाम चांगल्या प्रकारे दिसून येतो. पण त्याच वेळी या जीवनसत्त्वामुळे कर्करोगाला प्रतिबंध होऊ शकतो, असे दाखवणारा कोणताही पुरावा मिळू शकलेला नाही.

या संशोधकांनी कर्करोग प्रतिबंधाचे उपचार झालेल्या ७९ हजारांहून अधिक रुग्णांची माहिती तपासली. ही माहिती विविध अभ्यासात नोंदवण्यात आली होती. या अभ्यासात जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार घेतलेल्या रुग्णांची तुलना करण्यात आली होती. हा कालावधी किमान तीन वर्षांचा होता. यात कर्करोग झाल्यानंतर मृत्यू झालेल्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले.



या संशोधनात असे दिसून आले की, जीवनसत्त्व 'ड' घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार केलेले रुग्ण यांच्यातील मृत्यूच्या प्रमाणात मोठा फरक आहे. जीवनसत्त्व 'ड' हे कर्करुग्णांसाठी किती महत्त्वपूर्ण ठरते, हे यातून दिसून आले, असे हायकल म्हणाले. असे असले तरी जीवनसत्त्व 'ड'ची नक्की किती मात्रा घ्यावी आणि त्याची रक्तातील पातळी किती असावी, ही माहिती यात मिळाली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

व्हॉट्सॲपवर 'या' नंबरवरून फोन आला तर
अजिबात उचलू नका! बँक अकाऊंट होईल रिकामे

व्हॉट्सॲपचा वापर आपण सर्वच जण मोठ्या प्रमाणात करत असतो. एक इन्स्टंट मेसेजिंग ॲप म्हणून व्हॉट्सॲप बेस्ट आहे. आपल्या नॉर्मल गप्पाटप्पांपासून ते ऑफिसची महत्त्वाची कामेही आपण या व्हॉट्सॲपवर करत असतो. पण हे ॲप जेवढं उपयुक्त आहे तेवढंच धोकादायक आहे. आजकाल व्हॉट्सॲपद्वारे कितीतरी स्कॅम होत असून अनेकजण यात फसले जात आहेत. आता आणखी एक नवीन प्रकरण समोर आले आहे. अनेकांना आंतरराष्ट्रीय नंबरवरून अचानक कॉल येत आहेत.

जर तुम्हाला देखील सतत काही ठरावीक आंतरराष्ट्रीय नंबर्सवरून व्हॉट्सॲपवर कॉल किंवा मेसेज येत असेल तर तुम्हाला सावध होण्याची गरज आहे. कारण हा तुमच्यासोबत स्कॅम असू शकतो.

हे कॉल्स इथिओपिया (+251), मलेशिया (+60), इंडोनेशिया (+62), केनिया (+254), व्हिएतनाम (+84) आणि इतर यांसारख्या वेगवेगळ्या देशांचे आहेत. तर व्हॉट्सॲप कॉल हे इंटरनेटद्वारे केले जातात. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, काही स्कॅम एजन्सी कार्यरत आहेत ज्या व्हॉट्सॲप कॉलसाठी आंतरराष्ट्रीय नंबर विकत आहेत. कोणत्याही आंतरराष्ट्रीय कॉल शुल्काची चिंता न करता या क्रमांकांवरून कॉल करू शकतात. अशाप्रकारच्या कॉल्समुळे तुमचा फोन हॅक होऊ शकतो, तुमचे बँकिंग डिटेल्सही समोरच्यांकडे जाऊ शकतात आणि तुमचं बँक खातं मोकळं होऊ शकतं. ट्विटरवरील अनेक वापरकर्त्यांनी आंतरराष्ट्रीय नंबरवर एकापेक्षा जास्त वेळा कॉल येत असल्याचं सांगितलं आहे. जर तुमच्या बाबतीतही असेच होत असेल आणि तुम्हाला या समस्येपासून मक्ती मिळवायची असेल, तर तुम्हाला या नंबरवरून येणाऱ्या कॉल्सकडे दुर्लक्ष करावे लागेल. जर तुम्हाला अचानक एखाद्या आंतरराष्ट्रीय नंबरवरून कॉल दिसला तर तो ताबडतोब डिस्कनेक्ट करा. हा नंबर देखील ब्लॉक करा. ते तुमची वैयक्तिक माहिती चोरू शकतात आणि तुम्ही तुमचे बँक खाते साफ करू शकतात.



हा व्हॉट्सॲप स्कॅमही चर्चेत

लोकांना व्हॉट्सॲप मेसेजद्वारे नोकऱ्या दिल्या जात असल्याचे मेसेज येत आहेत. हे लोक कोणत्या ना कोणत्या कंपनीचे असल्याचा दावा करतात आणि दररोज पैसे पुरवण्याची चर्चा करतात. घरबसल्या आरामात काम करता येतं असं म्हणतात. एकदा वापरकर्त्यांना त्यांचे पैसे मिळाले की ते स्कॅमरवर विश्वास ठेवू लागतात आणि मोठ्या घोटाळ्यात अडकतात. अशा घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. अशा प्रकरणांपासून दूर राहण्याचीही गरज आहे.

कच्ची केळी
खाण्याचे फायदे



वजन होते कमी : वजन कमी करण्यासाठी रोज एक कच्चे केळे खायचा सल्ला डॉक्टर देतात. केळ्यामध्ये असलेल्या फायबर्समुळे शरीरातील अनावश्यक फॅट सेल्स काढून टाकायला मदत होते.

बद्धकोष्ठतेच्या समस्येवर उपाय : कच्च्या केळ्यामध्ये असलेल्या फायबर आणि स्टार्चमुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते.

भुकेवर ताबा मिळवण्यासाठी : कच्च्या केळ्यांमधील फायबर, इतर पोषक गुणांमुळे भुकेवर ताबा मिळवता येतो. कच्ची केळी खाल्ल्यामुळे लागणारी भूक नियंत्रणात येते. जंकफूडपासून वाचता येऊ शकते.

पचन प्रक्रिया होते चांगली : कच्ची केळी खाल्ल्यामुळे पचन प्रक्रिया चांगली होण्यास मदत होते. कच्च्या केळ्यामुळे कॅन्सरचा धोकाही कमी होतो. यातील कॅल्शिअममुळे हाडे मजबूत होतात.

डायबिटीसवर नियंत्रण – तुमचा डायबिटीस प्राथमिक स्टेजमध्ये असेल तर कच्ची केळी खायला सुरुवात करा. कच्च्या केळ्यामुळे डायबिटीस नियंत्रणात यायला मदत होते.

केसांचे आरोग्य

हेल्थ कॉन्शस पण ज्ञान मात्र जाहिरातीतून मिळवलेले, अशा विचित्र परिस्थितीला आपण सध्या सामोरे जात आहोत. जगन्मान्य असलेली 'फॅमिली डॉक्टर' ही संकल्पनाही आता जवळजवळ अस्तित्व हरवून बसलेली. अशावेळी किरकोळ आजारासाठी अथवा काही आरोग्यदायी सल्ल्यांसाठी काही माहिती लागली तर ती कुठे मिळवायची? असा प्रश्न येतो.

फार पूर्वीपासून भारतीय संस्कृतीत किरकोळ आजारांसाठी आजीबाईचा बटवा महत्त्वाचे स्थान मिळवून होता. आता आजीच घरात असणे अवघड, तर बटवा कुठून मिळायचा? पण आजही अगदी घरातच असणाऱ्या साध्यासाध्या पदार्थांपासून किरकोळ उपचार कसे करायचे याचे मार्गदर्शन देण्याचा हा प्रयत्न. यातील उपचार प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य श्रीकांत बागेवाडीकर यांना विचारून घेतले आहेत.

केस हा साऱ्यांच्याच जिव्हाळ्याचा विषय. केसांमुळे माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला एक प्रकारची ओळख मिळत असते. विशेषतः महिलावर्गाला ही ओळख जास्त महत्त्वाची असते. केस कुणाच्याही सौंदर्यात कशी भर घालतात हे काही सांगायला नको. मात्र या केसांची निगा आणि काही तक्रारी असल्यास त्या दूर करणे हे मोठे कामच होऊन बसते. अशा वेळी हे छोटे छोटे उपाय नक्कीच फायद्याचे ठरतात. चटकन करता येणारे हे उपाय करून पाहावेत असेच आहेत.



केस पांढरे होणे – १०० ग्रॅम खोबरेल तेलात २० ते २५ लाल जास्वंदीची फुले मंद आचेवर तळून काढावीत. पाण्याचा अंश गेला की फुलांसकट तेल गार होऊ द्यावे व मग गाळून बाटलीत भरावे. हे तेल आठवड्यातून किमान दोन वेळा केसांना लावावे.जास्वंद हा उत्तम नैसर्गिक डाय असून त्याचे इंग्रजी नाव 'शू फ्लॉवर' असे आहे. पूर्वीच्या काळी ही फुले बुटांना पॉलिश करण्यासाठी वापरली जात असत.

दह्यामध्ये दुधापेक्षा अधिक प्रमाणात प्रथिने आणि जीवनसत्त्वे असतात, तसेच दुधाच्या मानाने दही पचण्यास जास्त हलके असते. दह्याच्या सेवनाने पचनशक्ती चांगली राहते. याशिवाय आपल्या शरीरासाठी आवश्यक असलेली अनेक पोषक तत्त्वे दह्यामध्ये आहेत. दही हे प्रथिनांचे प्रमुख स्रोत असून, ही प्रथिने दुधात असलेल्या प्रथिनांच्या मानाने पचवण्यास हलकी असतात. ज्या व्यक्तींना दुधामध्ये असलेल्या लॅक्टोज या तत्त्वाची ॲलर्जी असते, त्या व्यक्तींना दही खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देतात. दुधाचे दह्यामध्ये परिवर्तन होत असताना, दुधातील लॅक्टोजचे लॅक्टिक ॲसिडमध्ये रूपांतर होत असते. त्यामुळे ज्यांना दूध पचत नाही, त्यांनी दह्याचे सेवन नियमित करावे.



दही; स्वादिष्ट आणि आरोग्यदायी

दह्यामध्ये असलेल्या कॅल्शियम आणि रिबोफ्लाविन या घटकांमुळे शरीरातील हाडांचा, ओस्टियोपोरोसीस सारख्या व्याधीपासून बचाव होतो. या व्याधीने ग्रस्त असलेल्या व्यक्तींनी दिवसातून किमान एकदा तरी दह्याचे सेवन अवश्य करावयास हवे, असे आहारतज्ज्ञांचे मत आहे. दह्यामध्ये अनेक रोगांवर मात करणारी गुणकारी तत्त्वे आहेत. पोटाशी निगडित विकार असणाऱ्यांनी दह्याचे सेवन करावे. जुलाब किंवा बद्धकोष्ठता यापैकी कशाचाही त्रास होत असल्यास दह्याच्या सेवनाने आराम पडतो. दह्यामध्ये असलेल्या लॅक्टोबॅसिली नामक बॅक्टेरियामुळे पोटाशी निगडित विकार बरे होण्यास मदत मिळते.

दह्याच्या सेवनाने कोलनचे आरोग्यही चांगले राहते. मोठ्या आतड्याच्या मुख्य आणि सर्वात लांब भागाला कोलन म्हणतात. दह्याच्या नियमित सेवनाने दह्यातील बॅक्टेरियामुळे कोलनचे आरोग्य सुधारून, कोलनचा कर्करोग होण्याची संभावना कमी होते. याशिवाय त्वचेशी निगडित समस्यांमध्ये ही दही किंवा ताकाचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. दह्याने किंवा ताकाने पोटामध्ये शीतलता जाणवते. त्यामुळे सतत खाज सुटणे, त्वचेवर लाल चट्टे उठणे, अंगाची आग होणे, या तक्रारी पुष्कळ प्रमाणात कमी होतात. तसेच निद्रानाश असलेल्या व्यक्तींनी रात्री झोपताना दह्याने डोक्याची मालिश करावी व आपल्या आहारात दह्याचा नियमित समावेश करावा. दह्यामध्ये गूळ मिसळून खाल्ल्यास कामोत्तेजना वाढते. वजन घटवण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींनी लो-फॅट दह्याचे सेवन करावे.

दह्यामध्ये झिंक, कॅल्शियम, जीवनसत्त्व बी१, बी२, बी६, आणि यीस्ट ही तत्त्वेही असतात. झिंक असल्याने दह्यामध्ये अँटी इंफ्लेमेटरी गुण आहेत. त्यामुळे त्वचेवरील मुरुमे कमी होण्यास मदत होते. तसेच दह्यामध्ये असलेली एन्झाइम्स त्वचेला आर्द्रता देतात, त्वचेवरील रंध्रांचा आकार कमी करतात, आणि त्वचा मुलायम, सतेज बनवतात. दही केसांच्या आरोग्यासाठी देखील अतिशय फायदेशीर आहे.

आठ वर्षांखालील मुलांना देऊ नका चहा-कॉफी
आरोग्यावर होतील 'हे' गंभीर परिणाम

लहान मुलांसमोर मोठी माणसं जेव्हा चहा-कॉफी पितात, तेव्हा त्यांनाही चहा-कॉफी पिण्याची इच्छा होते. अशा वेळी तू लहान आहेस, असे सांगून मोठी माणसे लहान मुलांना चहा-कॉफी देण्यास टाळाटाळ करतात. मात्र काही जण मुलांच्या हट्टापुढे गुडघे देऊन त्याला चहा-कॉफी देतात आणि मग हळूहळू त्यांना त्याचे व्यसन लागते. पण तुम्हाला माहीत आहे की, आठ वर्षांखालील लहान मुलांना चहा-कॉफी दिल्यास त्यांच्या शरीरावर फार गंभीर परिणाम होऊ शकतात.

तसे पाहता जंकफूड, शीतपेय आणि चहा-कॉफी या तिन्ही गोष्टी लहान मुलांच्या शरीरास खूपच घातक आहेत. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, कॉफीमध्ये भरपूर प्रमाणस कॅफीन असते. हा पदार्थ खूपच उत्तेजक असल्यामुळे तो लहान मुलांच्या शरीरास अपायकारक आहे. त्यामुळे त्यांना वेगवेगळे आजार होऊ शकतात.

लहान मुलांना चहा-कॉफी दिल्यास होऊ शकतात हे परिणाम

▮ लहान मुलांना पोटदुखीच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते.

▮ चहा-कॉफी प्यायल्याने त्यांना झोप लागत नाही.

▮ लहान मुलांच्या हृदयाचे ठोके वेगाने होतात.

▮ तसेच खूप कमी वयात त्यांना डोकेदुखीची समस्या उद्भवू शकते.

▮ शक्यतो लहान मुलांना आठ वर्षांनंतर आणि जमल्यास १६ वर्षांनंतर चहा-कॉफी देणे अधिक चांगले. जमेल तितके त्यांना चहा-कॉफीपासून दूर ठेवा आणि त्यापेक्षा फायद्याचे आणि पोषक असे दूध रोज प्यायला द्या.

जर तुम्ही तुमच्या मुलांना कोल्ड्रिंक्स, कॉफी, फ्लेव्हर्ड फ्रुट ड्रिंक्स यांपासून दूर ठेवला नाहीत तर त्यांच्या शरीरावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. यात काहींना खूप त्वरित तर काही काही काळानंतर अनेक गंभीर परिणामांना आणि आजारांना सामारे जावे लागू शकते.



पाठदुखीपासून असा मिळवा आराम



आजकालच्या धावत्या युगाला अनुसरून बदललेली आपली जीवनशैली, असंतुलित आहार, जेवण्याचे अनियमित असणारे वेळापत्रक, व्यायामाचा अभाव आणि काम करताना किंवा एरवीही खुर्चीवर बसतानाची चुकीची पोझिशन किंवा स्थिती या सगळ्यांमुळे आपल्यापैकी बहुतेकांनी पाठदुखीची तक्रार कधी ना कधी अनुभवलेली असते. एकदा पाठदुखी सुरू झाली की मग रोजची लहानसहान कामे करणे देखील अशक्यप्राय होऊन बसते. काही प्राथमिक औषधोपचारांनी तात्पुरता आराम मिळत असला तरी या औषधांचा परिणाम ओसरला की पाठदुखी पुनश्च सुरू होते. तसेच फार काळ जर पेन किलर्सचा वापर केला गेला, तर त्याचेही दुष्परिणाम जाणवू लागतात. परिणामी, पाठदुखीच्या जोडीने ॲसिडिटी, शरीरामध्ये उष्णता वाढून सतत तोंड येणे, असल्या नव्या तक्रारी सुरू होतात. त्यामुळे पाठदुखीच्या त्रासातून मुक्तता मिळवण्याकरिता शक्यतो नैसर्गिक आणि सुरक्षित उपायांचा वापर करणे कधीही चांगले.

हर्बल किंवा आयुर्वेदिक तेलांनी केलेला मसाज पाठदुखीसाठी चांगला आहे. घरच्या घरी मसाज करण्यासाठी निलगिरी, मोहरी, किंवा नारळाच्या तेलाचा वापर केला जाऊ शकतो. तेल थोडे गरम करून घेऊन मग त्याने मसाज करावा. त्यानंतर थोड्या वेळाकरिता तेल तसेच राहू देऊन, मग गरम पाण्याने स्नान करावे. आजकाल बाजारामध्ये खास मसाजसाठी अनेक प्रकारची आयुर्वेदिक व हर्बल तेल उपलब्ध असतात. पण वैद्यकीय सल्ल्यानुसारच या तेलांचा वापर करावा. पाठदुखीसाठी तेलाचा मसाज आवश्यकता असेल तर दररोज करावा.

हळदीमध्ये असलेल्या 'कुकुर्मीन' या तत्त्वामुळे अंगावरील सूज कमी होऊन अंगदुखीपासून आराम मिळतो. त्यामुळे पाठदुखी सतावत असल्यास दररोज एक ग्लास दुधामध्ये पाव चमचा हळद घालून प्यावे. आवश्यकता वाटल्यास दुधामध्ये अर्धा चमचा मध चवीकरिता घालावा. त्याचप्रमाणे मॅग्नेशियम सल्फेटमुळे (यालाच इप्सम सॉल्ट असेही म्हणतात) ही अंगावरील सूज कमी होण्यास मदत मिळते. याच्या वापराने रक्ताभिसरण सुधारून, अंगदुखी कमी होते.

अंघोळीच्या गरम पाण्यामध्ये हे इप्सम सॉल्ट घालून ते पाणी पाठीवर घेत पाठ शेकून काढावी. आल्याचा वापर केल्यानेही अंगावरील सूज व दुखणे कमी होण्यास मदत होते. दीड कप पाण्यामध्ये आल्याचे काही तुकडे घालून हे पाणी उकळून घ्यावे. दिवसभरात हे पाणी थोडे-थोडे करून तीन ते चार वेळा प्यावे.

बर्फाची पिशवी पाठीवर फिरवल्यानेही पाठीवर सूज असल्यास ती कमी होऊन पाठदुखी कमी होते. जर बर्फाची पिशवी नसेल, तर एखाद्या जाडसर टॉवेलमध्ये बर्फ घेऊन तो बर्फ पाठ दुखत असलेल्या ठिकाणी पंधरा ते वीस मिनिटे फिरवावा. पाठदुखीमध्ये गरम पाण्याच्या पिशवीचा शेक घेतल्यानेही आराम मिळतो.

केईएम रुग्णालयामध्ये गरीब रुग्णांना शस्त्रक्रियेत दिलासा मिळणार

अत्याधुनिक 'व्हेसल सीलर' उपकरणांची उपलब्धता

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि सर्वसामान्यांना दजेदार उपचार मिळावेत या उद्देशाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. मुंबईतील सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज आणि केईएम हॉस्पीटल येथे अत्याधुनिक 'हाय-एंड व्हेसल सीलर' उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे शस्त्रक्रियांच्या गुणवत्तेत मोठी सुधारणा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा मिळणार आहेत. या सीएसआर प्रकल्पांतर्गत दोन प्रगत इलेक्ट्रोसर्जिकल युनिट्स जनरल सर्जरी विभागासाठी 'इलेक्टिव्ह सर्जरी ओटी' जमेशदजी मेहता शस्त्रक्रिया कक्षामध्ये बसविण्यात आले आहेत.



मुख्यमंत्र्यांनी मानले आभार

केईएम रुग्णालय हे मुंबईतील सर्वात मोठ्या सार्वजनिक आरोग्य संस्थांपैकी एक असून येथे दररोज हजारो गरजू रुग्ण उपचारासाठी येतात. अशा परिस्थितीत अत्याधुनिक उपकरणांची गरज अत्यंत महत्त्वाची होती. नव्याने बसविण्यात आलेली ही उपकरणे शस्त्रक्रियेदरम्यान रक्तस्त्राव नियंत्रणासाठी उपयुक्त ठरणार असून रक्तवाहिन्या सील करून रक्तस्राव त्वरित थांबवण्यास मदत करतात. या उपकरणांमुळे शस्त्रक्रियेची अचूकता वाढेल, गुंतागुंत कमी होईल आणि रुग्णांच्या सुरक्षिततेत मोठी वाढ होईल. विशेषतः जटिल शस्त्रक्रियांमध्ये रक्तस्राव कमी होऊन डॉक्टरांना अधिक कार्यक्षमतेने उपचार करता येणार आहेत. या उपक्रमासाठी इंडियन ऑइल कंपनीने सहकार्य केले आहे त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की, ह्याराज्यातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण आणि अत्याधुनिक आरोग्य सेवा मिळणे ही सरकारची प्राथमिकता आहे. अशा प्रकल्पांमुळे सार्वजनिक रुग्णालयांची क्षमता वाढून गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळतो.ह्ल या उपक्रमामुळे केवळ आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचावणार नाही, तर गरीब आणि वंचित घटकांसाठी आधुनिक वैद्यकीय सुविधांचा मार्गही अधिक सुलभ होणार आहे.

दुसरीकडे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गोदाम लॉजिस्टिक्स पार्कचे उद्घाटन

दरम्यान, मुख्यमंत्र्यांकडून हस्ते गोदाम लॉजिस्टिक्स पार्कचे उद्घाटन करण्यात आले. "सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात अनेक मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. मात्र, ज्या वेळी संधी उपलब्ध होतात, त्याच वेळी नवीन आव्हानेही समोर उभी राहतात. लॉजिस्टीक्सवर होणारा खर्च हेच सध्या उत्पादन क्षेत्रापुढील सर्वात मोठे आव्हान असून जागतिक पुरवठा साखळीचा प्रभावी भाग बनायचे असेल, तर आपल्याला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होणे अत्यावश्यक आहे", असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, "नागपूर व गडचिरोली भागातही आता उद्योग मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. त्यामुळे लॉजिस्टीक्सच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार आहेत. सध्याची स्थिती पाहता आणखी कितीतरी प्रमाणात लॉजिस्टीक्सच्या व्यवस्थेत वाढ होण्यास वाव दिसत आहे. या क्षेत्रामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून गोदाम लॉजिस्टिक्स पार्क हा नागपूरच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल", असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज्यातील २३ हजार पाणथळ क्षेत्रांना तत्काळ कायदेशीर संरक्षण द्या

पर्यावरणवाद्यांची मागणी



■उरण। प्रतिनिधी,

राज्यातील २३ हजारांहून अधिक पाणथळ क्षेत्रांना तत्काळ कायदेशीर संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनाचे औचित्य साधून ही मागणी करण्यात आली.

ते म्हणाले की, या क्षेत्रांकडे सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षामुळे जैवविविधतेचा ऱ्हास वेगाने होत असून, हवामान बदलाचा सामना करण्याची राज्याची क्षमता कमकुवत होत आहे. दरवर्षी २२ मे रोजी साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिन' हा परिसंस्थांचे संवर्धन, संकटग्रस्त प्रजातींचे संरक्षण आणि पर्यावरणीय समतोल राखण्याच्या जागतिक गरजेवर भर देतो. राष्ट्रीय शाश्वत किनारी व्यवस्थापन केंद्राने राज्यातील एकूण २३,४१५ पाणथळ क्षेत्रांपैकी २३,४०४ क्षेत्रांचे दस्तावेजीकरण आणि प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन पडताळणी पूर्ण केली आहे. अधिकृत नोंदीनुसार, आता केवळ पुणे जिल्ह्यातील ११ पाणथळ क्षेत्रांची पडताळणी बाकी आहे. उपग्रह प्रतिमांच्या आधारे शोधलेल्या या क्षेत्रांची पर्यावरणीय स्थिती, सीमा आणि अस्तित्वाची खात्री झाल्यानंतरच 'पाणथळ क्षेत्र (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम' अंतर्गत औपचारिक अधिसूचना जारी केली जाते.

'सागरशक्ती'चे संचालक नंदकुमार पवार यांनी सांगितले की, उरण आणि आसपासच्या किनारी भागांमध्ये पाणथळ क्षेत्रांच्या नाशाचे गंभीर परिणाम आधीच दिसू लागले आहेत. महाराष्ट्रातील दलदली, खाड्या, खारफुटी, सरोवरे आणि पूरक्षेत्रे ही स्थलांतरित पक्षी, मत्स्य प्रजनन आणि वन्यजीवांसाठी नाजूक परिसंस्था आहेत. ही क्षेत्रे माती आणि वनस्पतींमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्बन साठवून हरितगृह वायू कमी करण्यास मदत करतात.

कल्याणमध्ये मोठी कारवाई, 34 कोटींचे हेरॉईन जप्त, पुरवठादाराची ओळख पटली

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण परिमंडळ 3 च्या अंमली पदार्थाविरोधात पथकाने कारवाई केली. या कारवाईत पथकाने तब्बल 9 किलो 768 ग्रॅम वजनाचे 34 कोटी 18 लाख 84 हजार रुपयांचे हेरॉईन जप्त केले. पुरठासदारासह एकूण पाच आरोपींच्या मुसक्या आवळण्यात त्यांना यश देखील मिळाले आहे. याच कारवाईमुळे मुंबई-कल्याण या शहारात अंमली पदाथार्चे रॅकेट समोर आले आहे. ज्यांच्यावर कारवाई करण्यात आली त्यांची ओळख कासिम अब्दुल सत्तार (वय 38), कृष्णा नागप्पा हळेमणी (वय 36), अमजद युसुफ पठाण (वय 47), गणेशन पुथुस्वामी जंगमार उर्फ अण्णा (वय 71)) आणि सद्दाम सत्तार वसईकर अशी समोर आली. या प्रकरणात सद्दाम गफूर शेख याच्यावर तब्बल 7 गुन्हे दाखल करण्यात आले.





पोलीस उप आयुक्त परिमंडल 3 यांच्या आदेशानुसार, 1 एप्रिल 2026 रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिर्कायांनी कर्मचारी महात्मा फुले चौक पोलीस ठाणे परिसरात गस्त घालत कारवाई केली. सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास स्मशानभूमीजवळ सांगळेवाडी रोडनजीक दोन संशयित आरोपींचा पोलिसांनी तपास केला होता. आरोपींच्या मागील असलेल्या बॅगांमुळे आरोपी असल्याचा अधिक संशय बळावला, नंतर त्यांनी घटनास्थळावरुन पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र, पोलिसांनी तत्काळपणे त्यांना ताब्यात घेत तपासणी केली. संबंधित प्रकरणात 9 किलो 236 ग्रॅम वजनाचे 32 लाख 60 हजार रुपये किंमतीचे हेरॉनईन आणि 39 हजार रोख रक्कम जप्त करण्यात आला होता.

कासिम वसईकरच्या घरातून 1 कोटी 85 लाख 85 हजार रुपयांचे हेरॉईन जप्त

अशातच एनडीपीएस कायद्यांतर्गत महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान, आरोपी कासिम वसईकरच्या शाहापूरातील घराची झडती घेतल्यानंतर आणखी 531 ग्रॅम हेरॉईन जप्त केले. या हेरॉनईनची किंमत ही सुमारे 1 कोटी 85 लाख 85 हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

अमली पदाथार्चा मुख्य पुरवठादार कोण?

या प्रकरणातील सखोल तपासातून या रॅकेटचा मुख्य पुरवठा हा अमजद युसुफ पठाण करत असल्याचे उघडकीस आले. तो कल्याण-नाशिक परिसरातून अंमली पदार्थांचा पुरवठा करत असल्याची माहिती समोर आली. अमजद पठाणने आरोपी हणेशन जंगमार उर्फ अण्णा याला हेरॉईन पुरवठा केल्याचे तपासातून निष्पन्न झाले. तर कासिम वसईकर आणि सद्दाम शेख हे दोघेही अमजद पठाणला 1 जून 2026 तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींवर यापूर्वी देखील खून, दरोडा, शस्त्र कायदा, MCOCA तसेच एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केल्याची माहिती समोर आली. विशेष म्हणजे, मुख्य आरोपी अमजद पठाण याच्यावर ठाणे, मुंबई, राजस्थान आणि मध्य प्रदेशात अनेक गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे आणि सहायक पोलीस अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करून कारवाई केली.

पोलिसांकडून ४ कोटी ८० लाख किमतीचे अमली पदार्थ नष्ट

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिक शहर पोलीस आयुक्तालयातर्फे एनडीपीएस कायद्यांतर्गत जप्त करण्यात आलेल्या एकूण रु.४ कोटी ८० लाख किमतीच्या अमली पदार्थांचा विधीवत नाश करण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. भद्रकाली पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा क्र. 3036/2010 अंतर्गत एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २० (ब), २९ अन्वये जप्त करण्यात आलेला गांजा मा. न्यायालयाच्या आदेशानुसार नष्ट करण्यात आला.



या कारवाईत एकूण २,४०० किलो गांजा होता. दिनांक २२ मे २०२६ रोजी ही नष्ट प्रक्रिया महाराष्ट्र एन्व्हायरो पॉवर लिमिटेड, रांजणगाव, पुणे येथे काटेकोर सुरक्षा व पर्यावरणीय नियमांचे पालन करून पार पाडण्यात आली. जप्त अमली पदार्थांचा नाश उच्चस्तरीय ड्रग डिस्पोजल समितीच्या देखरेखीखाली करण्यात आला.

यावेळी अपर पोलीस महासंचालक ज्योतिप्रिया सिंग, पोलीस उपमहानिरीक्षक प्रविणकुमार पाटील, पोलीस अधीक्षक अनुज तारे, तसेच पोलीस उपआयुक्त (गुन्हे, नाशिक शहर) किरणकुमार चव्हाण यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशिला कोल्हे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पाटील, उपनिरीक्षक रंजन बेंडाळे आणि अंमली पदार्थविरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार, तसेच भद्रकाली पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कारवाईमुळे नाशिक शहर पोलीस दलाची अंमली पदार्थांविरुद्धची कठोर व सातत्यपूर्ण भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे.

डोंबिवलीत ड्रग्जविरोधात कारवाई महिलेची चौथ्या मजल्यावरून उडी...



■डोंबिवली। प्रतिनिधी,

डोंबिवलीतील खोणी आणि पलावा परिसर पोलिसांच्या रडारवर आले. ड्रग्ज तस्करी आणि बेकायदेशीर वास्तव्याविरोधात ठाणे आणि नवी मुंबई पोलिसांनी संयक्तीरित्या मोठे कॉम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले आहे. पलावा परिसरातील लोढा डाउनटाऊनमनधील हायप्रोफाईन सोसायट्यांमध्ये सुरू असलेल्या सुरू असलेल्या या तस्करीविरोधात पोलिसांनी कारवाई केली. यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

इतर नागरिकांसह 4 अल्पवयीन मुलांसह समावेश

नवी मुंबई पोलीस आणि मानपाडा पोलिसांच्या संयुक्त पथकाने सकाळी सात ते बारा वाजण्याच्या सुमारात या प्रकरणात शोधमोहिम राबविली होती. याच मोहिमेत 150 हून अधिक पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचा देखील समावेश होता. या धडक कारवाईत 24 विदेशी नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतले, ज्यात 14 पुरूष, 6 महिला आणि 4 अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. प्राथमिक तपासतून संबंधित लोक हे नायझेरिया, युगांडा आणि घाना येथील असल्याचे सांगण्यात येते.

चौथ्या मजल्यावरून उडी मारली अन्..

या कारवाईदरम्यान नवी मुंबईतील अमली पदार्थ तस्करी प्रकरणातील मोस्ट वॉन्टेड आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतलं. या प्रकरणातील आरोपींचे नाव बदलून पलावा परिसरातील हायप्रोफाईल सोसायटीत राहत असल्याचे उघडकीस आले. कारवाई सुरू असताना एका नायझरियन महिलेने चौथ्या मजल्यावरून उडी मारली असता, ती गंभीर जखमी झाली.

तपासादरम्यान, काही फ्लॅटचे वैध एग्रीमेंट न करता विदेशी नागरिकांना भाडेतत्वार खोल्या देण्यात आल्या होत्या. या प्रकरणी घरमालकांवरही कारवाई करण्यात आली आहे. संबंधित प्रकरणातील कारवाई ही ऊढढ अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ACP सुहास हेमाडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे आणि त्यांच्या पथकाने केली. या प्रकरणातील मोठे ड्रग्ज रॅकेट उघडकीस आले आहे.

8 लोकांकडे वैध पासपोर्ट आणि व्हिसा नव्हता

पोलीस तपासातून काही धक्कादायक माहिती समोर आलेली आहे. यापैकी 8 लोकांकडे वैध पासपोर्ट आणि व्हिसा नसल्याचे आढळून आले, तर 9 जणांविरूद्ध विविध पोलीस ठाण्यात ठऊढर कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. काही लोकांचे पासपोर्ट हे न्यायालयीन प्रक्रियेमुळे जप्त करण्यात आले, अशी माहिती पोलिसांना सांगितली.

साताऱ्यात बोगस कॉल सेंटर चालवत अमेरिकन नागरिकांची फसवणूक... मुंबईतील २१ जणांच्या टोळीला अटक



■कराड। प्रतिनिधी,

कोरेगाव येथे बोगस कॉल सेंटर चालवत अमेरिकन नागरिकांची डिजिटल अरेस्टद्वारे फसवणूक करणाऱ्या मुंबईतील २१ जणांची टोळी साताऱ्याच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी गजाआड केले.

२२ मे रोजी मध्यरात्री कोरेगाव येथील रिलायबल अपार्टमेंटमधील 'श्रीसाई लॉजिस्टिक्स ॲण्ड कन्सल्टंस' नावाने चालविण्यात येत असलेल्या बोगस कॉल सेंटर छापा मारत पोलिसांनी केलेल्या कारवाईत १७ इसमांसह व ४ महिलांना जेरबंद केले. गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांना खबऱ्यांमार्फत माहिती मिळाली की, सागर हरिश्चंद्र सूर्यवंशी हा श्रीसाई लॉजिस्टिक्स ॲन्ड कन्सल्टंस हे बोगस कॉल सेंटर चालवत आहे. अमेरिकन नागरिकांची तो फसवणूक करत होता. याबाबतची माहिती कळताच पोलीस निरीक्षक घोडके यांनी पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे यांच्या अधिपत्यासाठी विशेष पथक तयार केले. सदर पथकाला सोबत घेत २२ रोजी मध्यरात्री १ वा. च्या सुमारास वरील ठिकाणी छापा टाकला. यावेळी तेथे १७इसम व ४ महिला बेकायदेशिरपणे बोगस नावाचे कॉल सेंटरद्वारे वरीलप्रमाणे अमेरिकन नागरिकांशी ऑनलाइन ॲपद्वारे संपर्क साधून, त्यांची फसवणूक करत असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, सागर हरिश्चंद्र सूर्यवंशी, वीरेंद्र बोडरे, अक्षय भंडारी, गुरुप्रसाद राणे, मनिष जोशी, शमशुद्दीन सफाट सय्यद, गौरव भानुदास लांडगे, अभिषेक संजय गुप्ता, इशांत खांडेकर, रितेश चौहाण, बाबू चलवादी, अवि वानखेडे, दीपक खंडारे, मोहंमद शफिक सलीम कोकणे, ओमकार संजय घार्गे, दिपेन विवेक जाधव, लेबीन लारसन सायमन यांच्यासह चार महिला संशयित आरोपींचा समावेश आहे.

हत्या की आत्महत्या? 'मिस पुणे' ट्विशा शर्माच्या मृत्यू प्रकरणात दुसऱ्यांदा पोस्टमॉर्टमचे आदेश

■नागपूर। प्रतिनिधी,

नोएडामध्ये राहत असलेली 33 वर्षीय अभिनेत्री आणि मॉडेल ह्यमिस पुणेह्ल ट्विशा शर्माच्या मृत्यूची चर्चा सध्या संपूर्ण देशात होत आहे. 12 मे रोजी मध्य प्रदेशातील भोपाळ येथील कटारा हिल्स भागात तिच्या सासरी राहत होती. इथेच तिचा मृत्यू झाल्याने हे प्रकरण चचेर्चा विषय बनला आहे. ट्विशाच्या सासरकडच्या लोकांनी तिने आत्महत्या केल्याचे सांगितले. तर, माहेरच्यांनी तिची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. तसेच, या प्रकरणात समोर आलेल्या काही सीसीटीव्ही फुटेजमुळे या प्रकरणात गंभीर वळण लागले आहे. या प्रकरणात तिचा पती तब्बल 10 दिवस फरार होता, पण त्याने थेट न्यायालयात आत्मसमर्पण केले. तसेच, तिच्या शवविच्छेदन अहवालात तिने गळफास घेतल्याचे स्पष्ट झाले असले तरीही तिच्या शरीरावर अनेक जखमांच्या खुणा आढळल्याने संशय आणखी बळावला आहे.

नेमकं काय काय घडलं?

मिस पुणे ठरलेल्या मॉडेल आणि अभिनेत्री ट्विशा शर्मानें गेल्यावर्षी म्हणजेच डिसेंबर 2025 मध्ये भोपाळचा वकील समर्थ सिंह यांच्याशी लग्न केले होते. तिची सासूही निवृत्त जिल्हा न्यायाधीश असून गिरीबाला सिंह असे त्यांचे नाव आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, 12 मे रोजी ट्विशाचा मृतदेह तिच्या सासरच्या घरात आढळून आला. सासरच्या लोकांनी तिने आत्महत्या केल्याचा दावा केला. तर, तिच्या वडिलांनी मुलीची हुंड्यासाठी हत्या केल्याचा गंभीर आरोप केला. यानंतर, 14 मे रोजी ट्विशाचा पती समर्थ सिंह आणि सासू गिरीबाला सिंह यांच्याविरोधात हुंडाबळी आणि मानसिक-शारीरिक छळाच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला.



पती फरार आणि आत्मसमर्पण

घटनेनंतर पती समर्थ सिंह फरार झाला असून, पोलिसांनी त्याचा शोध घेण्यासाठी 6 पथके तयार केली होती. तसेच, त्याच्यावर 10 हजारांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. तो देश सोडून पळून जाऊ नये म्हणून पासपोर्ट कार्यालयाचीही मदत घेण्यात आली होती. दरम्यान, समर्थने अटक टाळण्यासाठी उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. त्यानंतर, तो जबलपूर जिल्हा न्यायालयात शरण आला. भोपाळ पोलिसांनी त्याला अटक केली. बार कौन्सिल ऑफ इंडियाने त्याची वकिली सनद तत्काळ प्रभावाने निलंबित केली. या प्रकरणात पोलीस निरीक्षक रजनीश कश्यप कौल यांच्या नेतृत्वात विशेष तपास पथकसाची स्थापना करण्यात आली. समर्थची सध्या कसून चौकशी सुरु आहे.

माहेरच्यांनी केले हे आरोप

ट्विशा शर्माच्या मृत्युनंतर तिच्या कुटुंबाने तिच्या सासू आणि पतीवर हत्येचा आरोप केला आहे. ट्विशाची व्हॉट्सॲप चॅटही व्हायरल झाली. त्यामध्ये तिने लिहिले होते की, आई, माझा जीव गुदमरतोय, हे लोक मला रडूही देत नाहीत आणि हसायलाही कारण देत नाहीत. कुटुंबीयांनी असाही दावा केला आहे की, लग्नानंतर ट्विशाचा सातत्याने छळ केला जात होता. कुटुंबीयांनी या प्रकरणात निष्पक्ष तपासाची मागणी केली आहे.

सासरच्यांनी फेटाळले आरोप

ट्विशाची सासू आणि निवृत्त न्यायाधीश गिरीबाला सिंह यांनी माहेरच्यांचे सर्व आरोप फेटाळले आहेत. गर्भवती असल्याचे समजल्यानंतर ट्विशाची मानसिक स्थिती अस्थिर झाली होती आणि तिला मूल नको असल्यामुळे ती स्वतःला इजा करून घेत होती, असा दावा सासूने केला आहे.

दुसऱ्यांदा शवविच्छेदन करण्याचे आदेश

शुक्रवारी (22 मे) मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने ट्विशाच्या मृतदेहाचे दुसऱ्यांदा शवविच्छेदन करण्याची परवानगी दिली आहे. हे शवविच्छेदन दिल्लीची एम्स रुग्णालयातील डॉक्टरांकडून करण्यात येणार आहे. कुटुंबीयांच्या मागणीवरून न्यायालयाने हा आदेश दिला.

सीबीआयकडून तपास

ट्विशा शर्मा मृत्यू प्रकरणात पुरावे नष्ट केल्याचा दावा करण्यात आला होता. हे हायप्रोफाइल प्रकरण लक्षात घेत मध्य प्रदेश सरकारने केंद्र सरकारकडे शिफारस केली होती. त्यानंतर आता या संपूर्ण प्रकरणाचा तपास देशातील सर्वोच्च तपास यंत्रणा म्हणजेच सीबीआयकडे (उइक) सोपवण्यात आला आहे. या प्रकरणी आता त्यांचा तपास आणि दिल्ली एम्सचा दुसरा शवविच्छेदन अहवाल अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

मृत्युच्या 60 मिनिटे आधी पार्लरमध्ये गेल्याचे उघड

आत्महत्येच्या एका तासाआधी ट्विशा शर्मा ही एका ब्युटी पार्लरमध्ये गेल्याचे तपासात समोर आले आहे. 12 मे रोजी ती ब्युटी पार्लरमध्ये गेली होती. ती तिथे सुमारे तीन तास थांबली होती. सीसीटीव्ही फुटेजमध्ये ती आराम करताना आणि हेड मसाज घेताना दिसत आहे. त्यानंतरच काही तासांनी ती तिच्या सासरच्या घरी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. यावेळी, पार्लरच्या मालकाने सांगितले की, ट्विशाची सासू गिरिबाला सिंह यांनी घटनेच्या दुसऱ्या दिवशी त्यांच्याशी संपर्क साधला होता आणि सर्व्हिस तसेच सीसीटीव्ही फुटेजची माहिती मागितली होती. त्यामुळे ही माहितीही आता तपासाचा भाग बनली आहे. सासरच्या घरातील सीसीटीव्ही फुटेजही संशयाच्या भोवऱ्यात आहे. यानुसार, ट्विशा रात्री 7.20 वाजता छताच्या दिशेने जाते. यानंतर साधारण एका तासाने तिचा मृतदेह खाली आणला जातो. मृतदेह खाली आणल्यानंतर सीपीआर देण्यात आला, परंतु तिचा जीव वाचवता आला नाही. त्यामुळे, 60 मिनिटांदरम्यान नक्की काय घडले? याचा पोलीस शोध घेत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com